- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५६ | किंमत : २ रूपये

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# औषध निरीक्षक भरती प्रक्रिया रद्द

## परीक्षेत गैरप्रकार, एमपीएससीने घेतला मोठा




**वृत्तसंस्था, मुंबई**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द केली. या परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर लीक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारे आयोगाने आज हा निर्णय घेतला. झालेली परीक्षाच रद्द झाल्याने यासाठी पुन्हा फेरपरीक्षा घेतली जाऊ शकते.

परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे निष्पन्न झाल्याने आणि एकाच उमेदवाराला या परीक्षेचा प्रश्न संच मिळाला आणि त्याचा लाभ घेतल्याचे उघड झाले. या मुद्यावरून विद्यार्थ्यांनी लढा दिला. त्याला मोठे यश मिळाले. या प्रकरणी सर्वप्रथम आमदार रोहित पवार यांनी पेपरफुटीचा आरोप केला होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अन्न व औषध प्रशासन-औषध निरीक्षक, गट ब भरती प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने फेरपरीक्षा आयोजित करणार आहे.

आयोगामार्फत औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवगार्साठी २९ जुलै २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. २२ मार्च २०२६ रोजीच्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत आयोगास दिनांक २२ ते २६ जुलै, २०२६ या कालावधीत ई-मेलद्वारे काही उमेदवारांमार्फत तसेच लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. परीक्षा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच दि. २० मार्च २०२६ रोजी काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका/प्रश्न मिळाले होते आणि ही प्रश्नपत्रिका सोशल मीडिया/इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसृत करण्यात आली होती, असे सदर तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले होते. यासंबंधीच्या निष्कर्षाआधारे आयोगाने औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठीची भरती प्रक्रिया रद्द केली.

### एका उमेदवारास प्रश्नसंच मिळाला
चौकशी अहवालात एकाच उमेदवारास प्रश्नसंच मिळाल्याचे आणि त्याचा लाभ झाल्याचे चौकशीत दिसून येत आहे, असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदविला. ही परीक्षा २२ मार्च २०२६ रोजी चाळणी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने ६ विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी घेतली होती.

# अमेरिका २ लाख परदेशी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्याच्या तयारीत

## ट्रम्प प्रशासनाचा मोठा निर्णय

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**
डोनाल्ड ट्रम्प प्रशासन अशा २ लाख परदेशी नागरिकांचे व्यावसायिक आणि टुरिझम व्हिसा रद्द करण्याच्या तयारीत आहे, ज्यांनी अमेरिकेत आश्रयासाठी अर्ज केलाय किंवा जे सध्या आश्रय मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अमेरिकेच्या इतिहासातील एकाच वेळी मोठ्या संख्येने व्हिसा रद्द करण्याची ही सर्वांत मोठी घटना ठरू शकते.

या योजनेला आव्हान दिले गेले नाही किंवा त्यात बदल केला गेला नाही, तर परराष्ट्र विभाग आगामी आठवड्यात या निर्णयाची घोषणा करण्याची शक्यता आहे. स्टेट डिपार्टमेंटची कागदपत्रे आणि अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने एका वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, या निर्णयाचा फटका अशा व्यक्तींना बसेल ज्यांना २०१६ ते २०२६ या कालावधीत बी-१ आणि बी-२ श्रेणीतील व्हिसा जारी करण्यात आले होते आणि ज्यांनी आश्रय मागितला आहे किंवा सध्या मागत आहेत.

स्टेट डिपार्टमेंटचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी सांगितले की, आम्ही डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटीसोबत मिळून अशा परदेशी नागरिकांची ओळख पटवत आहोत आणि त्यांचे नॉन इमिग्रंट व्हिसा रद्द करीत आहोत, जे अल्पकालीन अभ्यागत म्हणून अमेरिकेत आले होते, परंतु नंतर येथे कायमस्वरूपी राहण्यासाठी त्यांनी आश्रयाचे अर्ज दाखल केले. पिगॉट यांनी रद्द केल्या जाणाऱ्या व्हिसांच्या नेमक्या संख्येला दुजोरा दिला नाही; त्यांनी नमूद केले की, ही प्रक्रिया सुरू असल्याने या संख्येत बदल होऊ शकतो आणि हे काम निरंतर सुरू राहील.

**थोडक्यात**

## साखरेच्या आयातीसाठी नवीन नियम लागू

नवी दिल्ली : साखरेच्या वाढत्या किमती आणि कमी होत असलेल्या साठ्यावरून देशातील राजकारण चांगलेच तापले आहे. मात्र आता सण-उत्सवांच्या काळात साखरेचे वाढते दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने कच्च्या साखरेच्या आयातीबाबतच्या नियमांमध्ये सुधारणा करून कठोर पावले उचलली आहेत. सुधारित नियमांनुसार साखरेचा होणारा मोठा साठा रोखण्यासाठी आयात केलेली कच्ची साखर दोन महिन्यांच्या आत शुद्ध करून विकणे अनिवार्य करण्यात आले आहे.

साखरेच्या दरातील वाढीच्या पार्श्वभूमीवर सरकारने सोमवारी (२४ ऑगस्ट) आयातीच्या अटींमध्ये बदल केले आहेत. आता टॅरिफ रेट कोटा अंतर्गत आयात केलेली कच्ची साखर पांढऱ्या किंवा शुद्ध साखरेमध्ये रूपांतरित करून दोन महिन्यांच्या आत देशांतर्गत बाजारात विकणे बंधनकारक आहे. यापूर्वी, आयात केलेली कच्ची साखर ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत देशांतर्गत बाजारात विकता यावी, यासाठी त्यावर वाजवी कालावधीत आणि बऱ्याच आधी प्रक्रिया करणे आवश्यक होते. आता मात्र, सुधारित नियमांनुसार प्रक्रिया आणि विक्रीसाठी दोन महिन्यांची कडक मुदत निश्चित करण्यात आली आहे.

सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन साखर आयात करण्यास परवानगी दिली आहे आणि शीतपेये व आइस्क्रीम उत्पादक, तसेच संबंधित व्यापारी व मोठ्या प्रमाणात साखर वापरणाऱ्यांसाठी साठवणुकीच्या मर्यादा निश्चित केल्या आहेत.

# चॉकलेटचे आमिष दाखवून तीन वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार

## आरोपी फरार, पहाटेच्या सुमारास गुन्हा दाखल

**वृत्तसंस्था, नांदेड**
राज्यातील महिला आणि लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचं दिसून येते आहे. नगरापूरच्या घटनेनं अवघा महाराष्ट्र हादरला होता, त्यानंतरही चिमुकल्यांवरील अत्याचाराच्या घटना पुढे येत आहेत. नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तीन वर्षीय चिमकुलीवर अत्याचार केल्याचा संतापजनक घटना उघडकीस आली आहे.

येथील एका गावात तीन वर्षांच्या चिमुकलीवर चॉकलेटचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची घटना समोर आली. या प्रकरणी पीडित बालिकेच्या आईच्या फिर्यादीवरून सोनखेड पोलिसांनी मंगळवारी (२५ ऑगस्ट) पहाटे गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपीचा कसून शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (२४ ऑगस्ट) सायंकाळी पीडित चिमुकली घरासमोरील अंगणात खेळत होती. त्याचवेळी शेजारी राहणाऱ्या नातेवाईक व्यक्तीने तिला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून सोबत नेले. साधारण २० ते २५ मिनिटांनंतर तो मुलीला पुन्हा घरी सोडून निघून गेला. मुलगी रडत असल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले. त्यामुळे, आईने विचारपूस केली असता, संबंधित व्यक्तीने तिच्यासोबत गैरकृत्य केल्याचे तिने सांगितले. चिमुकली नात्याने त्या आरोपीला 'बाबा' अशी हाक मारायची. मुलीला दुखापत झाल्याचे



निदर्शनास येताच पालकांनी तिला तातडीने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात (विष्णूपुरी) दाखल केले. सध्या तिच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच सोनखेड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पहाटे तीनच्या सुमारास संशयिताविरुद्ध पोक्सो व अन्य संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला असून, पोलीस पथके त्याचा शोध घेत आहेत.

या अमानुष कृत्यामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. तर, लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटनांकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे.

# ४३ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## काही अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर नव्या जबाबदाऱ्या

**वृत्तसंस्था, मुंबई**
पोलिस आस्थापना मंडळ क्रमांक १ च्या शिफारशीनुसार राज्यातील ४३ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदली आणि पदस्थापनेचे आदेश जारी करण्यात आले. प्रशासकीय कारणास्तव या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, बीड, गडचिरोली, रायगड, नाशिक, अमरावती यांसह विविध ठिकाणच्या अधिकाऱ्यांचा यात समावेश आहे.

यात काही अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर नवीन जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत तर काही अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली. स्वप्नील राजाराम राठोड यांची ठाणे शहरातील सहायक पोलिस आयुक्त पदावरून गंगाखेड उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली तर राजेंद्र श्रीरंग शिरतोडे यांची गंगाखेड येथून ठाणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली. शिवाजी मारुती गायकवाड यांची गडचिरोली येथील पोलिस उपअधीक्षक पदावरून नागपूर शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. महेश कृष्णराव चव्हाण यांची भामरागड येथून नागपूर शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली झाली.

शुभदा शैलेश सांख्ये यांची नागपूर येथील अंमली पदार्थ टास्क फोर्समधून पुणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. सविता नरेंद्र शितोळे यांची नागपूर गुन्हे अन्वेषण विभागातून पुणे शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली. आसिफ अब्दुल अजीज शेख, विलास रामदास भोसले, चेतन बाळूभाई राठोड आणि सिमा विनायक मेर यांची अनुक्रमे गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर आणि बीड येथून मुंबई शहरात सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. राजीव धुराजी निले यांची सातारा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी पदावरून बीड येथे पोलिस उपअधीक्षक, मुख्यालय म्हणून बदली करण्यात आली. राजू संभाजी सोनावणे यांची महाराष्ट्र सायबरमधून श्रीवर्धन, रायगड येथे उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

डॉ. निलेश पालवे यांची गंगापूर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथून महाराष्ट्र सायबरमध्ये पोलिस उपअधीक्षक म्हणून बदली करण्यात आली.

मंगेश सखाराम चाळके यांची मुंबई पोलिस नियंत्रण कक्षातून मुंबईचे सहायक पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. निनाद मधुकर सावंत यांची मुंबई शहरातील सहायक पोलिस आयुक्त पदावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुंबई मुख्यालयात अपर पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

# कांद्याने डोळ्यात पाणी, साखरेने गोडवा महागला; गृहिणींचे बजेट कोलमडले!

## साखर ७० ते ८०, कांदा ६० ते ७० रुपये किलो; नरखेड तालुक्यात महागाईचा स्वयंपाकघरावर थेट घाव

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
साखर, गोडे तेल आणि गूळ यांच्या वाढत्या दरांनी आधीच सर्वसामान्यांचे बजेट बिघडले असताना आता कांदा, लसूण आणि अद्रक यांच्या दरवाढीने नरखेड तालुक्यातील महिला व गृहिणींच्या स्वयंपाकघराचे संपूर्ण गणितच बिघडले आहे. महिन्याचा घरखर्च सांभाळताना गृहिणींना मोठी कसरत करावी लागत असून, 'आता कोण सांगणार, कांदा घ्यायचा की साखर?' असा संतप्त सवाल महिला वर्गातून उपस्थित होत आहे.

ग्रामीण भागात साखरेचा दर किलोमागे ७० रुपयांपर्यंत पोहोचला असून काही ठिकाणी २० रुपये पाव या प्रमाणे विक्री होत असल्याने प्रत्यक्षात ग्राहकांना ८० रुपये किलोपर्यंत साखर खरेदी करावी लागत आहे. दुसरीकडे कांद्याचा दर ६० रुपयांपर्यंत पोहोचला असून किरकोळ बाजारात कांदा ६० ते ७० रुपये किलो दराने विकला



जात आहे. त्यामुळे रोजच्या स्वयंपाकासाठी आवश्यक वस्तूंची खरेदी करताना गृहिणींना खर्चाचा हिशेब पुन्हा पुन्हा मांडावा लागत आहे.

सणासुदीच्या दिवसात साखर महागल्याने गोड पदार्थांचा गोडवा महागला आहे, तर रोजच्या जेवणातील कांद्याने गृहिणींच्या डोळ्यात पाणी आणले आहे. कांद्यासोबतच लसूण सुमारे ३०० रुपये किलो आणि अद्रक २०० रुपये किलोपर्यंत पोहोचल्याने स्वयंपाकघरातील दैनंदिन खर्चात मोठी वाढ झाली आहे.

महिन्याच्या सुरुवातीला ठरविलेले घरगुती बजेट महिनाअखेरीस पूर्णपणे कोलमडत असल्याची व्यथा अनेक महिला गृहिणी व्यक्त करीत आहेत. मुलांचे शिक्षण, किराणा, दूध, भाजीपाला आणि इतर दैनंदिन खर्च सांभाळताना वाढत्या महागाईमुळे गृहिणींची मोठी दमछाक होत आहे. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांमध्ये तर घरखर्च कसा भागवायचा, हा प्रश्न महिलांसमोर उभा ठाकला आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजूर तुटपुंज्या उत्पन्नावर कुटुंबाचा गाडा हाकत आहेत. अनेक कुटुंबांमध्ये घरातील किराणा आणि दैनंदिन गरजांची जबाबदारी महिलांवर असते. त्यामुळे वाढत्या महागाईचा सर्वाधिक फटका घरातील स्वयंपाकघर सांभाळणाऱ्या गृहिणींनाच बसत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

एकीकडे रासायनिक खते, बियाणे आणि फवारणीच्या औषधांचे दर वाढत आहेत, तर दुसरीकडे घरातील साखर, तेल, कांदा आणि इतर जीवनावश्यक वस्तूही महाग होत आहेत. उत्पन्न तेवढेच आणि खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत असल्याने महिलांसमोर घरखर्चाचे संतुलन राखण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. स्थानिक बाजारपेठेत भाजीपाल्याचे वाढते दर पाहून अनेक गृहिणींना खरेदीचे प्रमाण कमी करावे लागत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, साखर आणि कांद्याचे भाव वाढले असले तरी या दरवाढीचा प्रत्यक्ष लाभ उत्पादक शेतकऱ्यांना मिळतो आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. शेतमाल बाजारात येतो तेव्हा अनेकदा शेतकऱ्यांना न परवडणाऱ्या दरात माल विकावा लागतो. कांद्याला भाव नसताना कांदा सडून जातो आणि योग्य भावासाठी कांदा उत्पादकांना आंदोलन करावे लागते. मात्र, बाजारात दर वाढल्यानंतर त्याचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा व्यापारी आणि मध्यस्थांच्या पदरात अधिक पडत असल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

साखर, गोडे तेल, गूळ, कांदा, लसूण आणि अद्रक यांसारख्या रोजच्या जीवनातील अत्यावश्यक वस्तूंचे भाव सातत्याने वाढत असल्याने गृहिणींसमोर महिन्याचे बजेट सांभाळण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. महागाईचा हा वाढता भडका कधी थांबणार आणि घरखर्चाचा गाडा सांभाळणाऱ्या महिला गृहिणींना दिलासा कधी मिळणार, असा सवाल आता नरखेड तालुक्यातून केला जात आहे. याबाबत शेतकरी संघटनेचे नागपूर जिल्हाध्यक्ष सागर दुधाने यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, 'आज बाजारात साखर, कांदा आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढले की सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसते; मात्र शेतमाल उत्पादनाच्या वेळी शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही. कांदा बाजारात आला की दर कोसळतात, कांदा सडतो आणि शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करतो.

आता बाजारात दर वाढल्यानंतर त्याचा खरा लाभ शेतकऱ्यांना न मिळता मध्यस्थ आणि व्यापाऱ्यांना होत असेल, तर ही व्यवस्था बदलण्याची गरज आहे. शासनाने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य व हमीभाव मिळेल अशी व्यवस्था करावी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीवर नियंत्रण ठेवून सर्वसामान्यांसह महिला गृहिणींना दिलासा द्यावा, सागर दुधाने, जिल्हाध्यक्ष, शेतकरी संघटना, नागपूर यांनी सांगितले.



संपादकीय लेखणीतून...

# संतश्रेष्ठ नरहरी महाराज

संत नरहरी महाराज (संत नरहरी सोनार) हे वारकरी संप्रदायातील एक थोर आणि प्रसिद्ध संत होते. ते पंढरपूर येथे राहायचे आणि त्यांचा सुवर्णकार (दागिने घडवण्याचा) व्यवसाय होता. सुरुवातीला ते कट्टर शिवभक्त होते, पण विठ्ठल आणि शंकर एकच असल्याचा साक्षात्कार झाल्यानंतर ते विठ्ठलमय झाले.

तेराव्या चौदाव्या शतकामध्ये वारकरी संतांची जी मांदियाळी निर्माण झाली त्यामध्ये संत नरहरी सोनारांचा समावेश होतो. नरहरी सोनार हे पंढरपूरचेच राहणारे होते. त्यांचे पूर्वज यादव राजाच्या देवगिरी नगरीत राहत होते. मूळ पुरुष मुकुंदराज या ठिकाणी सराफाचा व्यवसाय करत होते. हे घराणे धार्मिक वृत्तीचे व शिवोपासक होते. मुकुंदराजांचा मुलगा मुरारी सोनार व त्यांचा मुलगा म्हणजे अच्युत सोनार. हे अच्युत सोनार देवगिरी सोडून पंढरपूरला येऊन राहिले. पंढरपूर येथे त्यांनी सोनाराचा व्यवसाय सुरू केला. याशिवाय घरात परंपरेने आलेली शिव उपासनाही चालू ठेवली. पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराजवळच असलेल्या मल्लिकार्जुन मंदिरात ते पूजेला जात व तेथेच सराफचा व्यवसाय करत. त्यांच्या पत्नीचे नाव सावित्रीबाई असे होते. या दांपत्याच्या पोटी संत नरहरी महाराजांचा जन्म झाला. परंपरेने श्रावण शुद्ध त्रयोदशी ही महाराजांची जन्मतिथी मानली जाते.

**कट्टर शिवोपासक-** संत नरहरी महाराजांना घरातूनच सोनारकीचे व शिवोपासनेचे बाळकडू मिळाले. हिंदू धर्मामध्ये विविध देवतांच्या उपासकांचे विविध संप्रदाय आहेत. विष्णू व त्याच्या अवतारांच्या उपासकांचा वैष्णव भागवत संप्रदाय, शंकराच्या उपासकांचा शैव संप्रदाय, शक्तीच्या - देवीच्या उपासकांचा शाक्त संप्रदाय, सूर्योपासकांचा सौर तर गणपतीच्या उपासकांचा गाणपत्य असे हे संप्रदाय आहेत. त्या काळात यातील संप्रदायांमध्ये व विशेष करून शैव व वैष्णवांमध्ये काही ठिकाणी तीव्र मतभेद व टोकाचे वाद असत. शैव मंडळी आडवे गंध लावतात तर वैष्णव मंडळी उभे गंध लावतात. त्याला अनुसरून शैव मंडळी घर सारवताना आडवे सारवत तर वैष्णव मंडळी उभे सारवत. एखादा कपडा शिवताना शिव म्हणणे म्हणजे सुद्धा शंकराच्या नावाचा उच्चार होतो म्हणून कट्टर वैष्णव त्या ऐवजी धागा घालणे, टाका घालणे वगैरे शब्दप्रयोग वापरत. नरहरी महाराज सुद्धा शिव उपासना करता करता कट्टरशैव बनले. पंढरपुरसारख्या तीर्थक्षेत्रात राहून सुद्धा ते पांडुरंगाच्या दर्शनाला जात नसत. संत नरहरीजींच्या पत्नीचे नाव गंगा, मंगळवेढ्या जवळील ब्रह्मपूरी गावच्या सानकस्य गोत्रात श्रीपती वेदपाठक (पोतदार) यांची मुलगी होती, तर त्यांच्या मुलांची नावे नारायण व मल्लीनाथ अशी होती. त्यांचे वडील श्री अच्युतराव व आईचे नाव सावित्री बाई असे होते. त्यांना नाईक- पोतदार हे उपनाम दक्षिण भारतात पत्तार या शब्दापासुन झाले म्हणून विश्वकर्मीय सोनारांना ही उपाधी आहे, पूर्वी सोनार समाजात पोटशाखा नव्हत्या. समाज व्यापारासाठी इतरत्र गेला, तेव्हा काल देश परत्वे खान-पान, राहणी बदलली. ब्राह्मण- पांचाळ व दैवज्ञ, क्षत्रीय- लाड व आयर/ अहिर, वैश्य- वैश्य, लिंगायत, बंजारा, सोनी व इतर अशी वर्णव्यवस्था झाली. त्या आधी संपुर्ण समाज विश्वकर्मा ब्राह्मण समाजच होता. सगळे एकच असून नंतर भेद निर्माण झाला, सोनार अशा उपाध्या प्राप्त होत्या. तसेच संत नरहरी महाराज हे वयोवृद्ध संत असल्यामुळे संतजन त्यांना महामुनी सुद्धा म्हणत असत.

अशाप्रकारे शिवोपासना व चरितार्थासाठी सराफाचा व्यवसाय करत असताना एक दिवस त्यांच्याकडे एक भाविक कंबरपट्टा बनवण्यासाठी आला. त्या भाविकाला विठ्ठलासाठी एक सोन्याचा कंबरपट्टा बनवायचा होता. संत नरहरी महाराज विठ्ठलाचे दर्शन घेणे सोडा, पण मंदिरात सुद्धा जायला तयार नव्हते. दागिने घडवण्यात संत नरहरी महाराजांनी चांगलेच कौशल्य मिळवले होते. त्यामुळे त्या भाविकाला त्यांच्याकडूनच कंबरपट्टा घडवायचा होता. तेव्हा त्या भाविकानेच विठ्ठल मूर्तीच्या कमरेचे माप घेऊन ते संत नरहरी महाराजांना सांगितले. संत नरहरी महाराजांनी त्याप्रमाणे सोन्याचा कंबरपट्टा घडवला.

हा सोन्याचा कंबरपट्टा घेऊन तो भाविक मंदिरामध्ये गेला व तो कंबरपट्टा विठ्ठलाला अर्पण केला. मंदिरातील पुजारी जेव्हा तो कंबरपट्टा देवाला घालायला गेले तेव्हा, तो कंबरपट्टा छोटा होतोय असे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे तो भाविक तो कंबरपट्टा घेऊन पुन्हा संत नरहरी महाराजांकडे आला व कंबरपट्टा वाढवायला सांगितला. नरहरी महाराजांनी त्याप्रमाणे कंबरपट्ट्यात बदल करून दिला पण यावेळेस तो कंबरपट्टा गरजेपेक्षा जास्त मोठा झाला. भाविकाने आणलेल्या मापामध्येच काहीतरी गडबड होते हे नरहरी महाराजांच्या लक्षात आले. आता माप घेण्यासाठी त्यांना मंदिरात जाणे भाग होते. पण भगवान शंकर सोडून इतर कोणत्याही देवतांचे दर्शन घेणे त्यांना मान्य नव्हते. आता काय करायचे? हा प्रश्न त्या भाविकासमोर उभा राहिला. डोळ्यांवर पट्टी बांधून ते विठ्ठलांच्या कमरेचा माप घेतांना त्यांना अनुभव आला की विठ्ठल व शिव भिन्न नसून ते एकच दैवत आहे.

# सरकारी उपक्रम एक, 'झेन-झी'चे प्रश्न अनेक!

**शशिकांत म.तोटे**
**दारव्हा,जि.यवतमाळ**

नीट वैद्यकीय प्रवेश परीक्षा मधील कथित गैरव्यवहार आणि पेपर लिक विरोधात जून- जुलै महिन्यात दिल्लीच्या जंतरमंतर येथे सीजेपी च्या नेतृत्वात आंदोलन झाले.ज्येष्ठ पर्यावरणवादी नेते रमण मॅगसेसे पुरस्कार प्राप्त सोनम वांगचूक हे उपोषणास बसले होते.त्यांचे उपोषण सव्वीस दिवस अखंडीत राहीले. तर सीजीपी च्या नेतृत्वात संसदेवर जाणाऱ्या मोर्चावर हिंसक वळण लागल्याची दुर्दैवी घटना वगळता, झेन झी च्या आंदोलनला अपेक्षित यश आले. या आंदोलनानंतर, तरुणांच्या असंख्य प्रश्नांना वाचा फुटली. संसदेपासून जवळच असलेल्या जंतरमंतर मैदानातील उपोषणस्थळी शासनाचा प्रतिनिधी म्हणून एकही फिरकला नाही. लोकशाही व शांततेच्या मार्गाने चालणाऱ्या आंदोलकांशी संवाद साधून, प्रश्न सोडविण्या ऐवजी आंदोलन दाबून टाकण्याचा प्रयत्न होताना दिसला.

या आंदोलना पश्चात संसदेत व देशात सरकारवर भरपूर टीका झाली.सदर आंदोलनाची दखल आंतरराष्टीय पातळीवर प्रसारमाध्यमांनी घेतली.केंद्रीय परीक्षा मधील पेपरफुटी,परीक्षा पद्धतीत पारदर्शकता आणि संपूर्ण शैक्षणिक व रोजगार यंत्रणेतील त्रुटी दूर करणे या रास्त मागण्या आंदोलकांच्या शासनापुढे होत्या. सरकारने काही मागण्या मान्य केल्या.नीट पेपर फुटीला चाप बसविण्यासाठी कठोर कायदा आला. शिक्षण मंत्र्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले. परंतू या सरकारी सोपस्काराने विद्यार्थ्यांचे प्रश्न निश्चितच सुटणार नाही.सरकारने परीक्षा पद्धती मधील विश्वासार्हता आणि तरुणांच्या मनातील भविष्याबद्दल साशंकता दूर करण्यासाठी ठोस धोरणात्मक पावले उचलण्याची मागणी आता जोर धरत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, सरसंघचालक मोहन भागवतांनी अलीकडेच सरकार आणि संस्थांनी तरुणांशी हुकूमशाही ऐवजी समाजाच्या माध्यमाने जोडले जावे आणि त्यांच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत असे प्रतिपादन केले. आजच्या पिढीला 'डिक्टेशन' नव्हे,तर त्यांच्याशी 'डिस्कशन' करणे आवश्यक आहे. आंदोलन आणि लोकशाही हक्काबाबत सरसंघचालकांनी तरुणांच्या प्रश्नांची पाठराखण केली. लोकशाहीत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे आणि प्रश्न विचारणे हा तरुणांचा कायदेशीर हक्क आहे.आंदोलन करणाऱ्या तरुणांना थेट राष्ट्रद्रोही ठरविणे चुकीचे आहे,असे असे नमूद केले ते बरेच झाले.

देशातील तरुणाईचा असंतोष पाहता, सरकारने आणि समाजाने त्यांच्या आकांक्षा समजून घेण्यासाठी सकारात्मक संवाद साधायला हवा.अशा संघाच्या भूमिकेनंतर, सरसंघचालकांच्या प्रतिपादनाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधानांनी सोशल मीडिया आणि आपल्या भाषणाच्या माध्यमातून तरुणांशी संपर्क वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तर सरकारी पातळीवर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'एक दिवस एक विद्यापीठ' हा उपक्रम हाती घेण्यावर चर्चा सुद्धा झाली.केंद्र सरकारचा देशातील तरुण पिढीशी थेट संवाद साधण्यासाठी व असंतोष दूर करून त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी सरकारी धोरणाशी जोडणे या उपक्रमाचा उद्देश आहे.'एक दिवस एक विद्यापीठ' उपक्रमातून दररोज एक केंद्रीय मंत्री देशातील एका नियुक्त विद्यापीठाला भेट देतील आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधतील. रोजगाराबाबत तरुणांच्या मनात असलेली शंका व समस्या मंत्री थेट जाणून घेतील.त्याचप्रमाणे सरकारी,विविध कल्याणकारी, शैक्षणिक, रोजगार व कौशल्य विकास योजनेची माहिती या उपक्रमातून विद्यार्थ्यांना दिली जाणार असल्याचे सांगितले जाते. या उपक्रमाची अधिकृत घोषणा व वेळापत्रक सरकारने जारी केले नसले तरी प्राथमिक तयारी शासनाकडून दृष्टीपटास आहे.

यूजीसीच्या नोंदणीनुसार, देशात केंद्रिंय, राज्य, खासगी, अभिमतअशा श्रेणीतील एकंदरीत तेराशेहून अधिक विद्यापीठे आहेत.या प्रत्येक विद्यापीठात मंत्रिमहोदय भेट देतील काय? एका दिवसाच्या उपक्रमाने वषार्नुवषीर्चे प्रश्न सुटतील काय? सरकारी उपक्रमाने विद्यापीठातील शैक्षणिक उणीवा दुरुस्त होतील? वर्षगिनती प्रलंबित असलेल्या प्रश्नांची सोडवणूक होईल की,मूळ समस्यांवर तात्पुरती मलमपट्टी ठरेल.अशा शंका मात्र कायम राहतात.उपक्रमाचे स्वागतच परंतु, हा उपक्रम किती काळ चालणार; व त्याची फळ निष्पन्नता काय? येणारा काळच ठरवेल. ज्या मूळ प्रश्नावरून झेन झी चे आंदोलन झाले. ते प्रश्न प्रारंभी सुटायला हवीत.जेणेकरून पुन्हा आंदोलने उभी होणार नाही.

उपक्रमातून राजकीय भाषणापेक्षा थेट विद्यार्थ्यांच्या काळजाला हात घातल्या जाणाऱ्या संवाद हवा. हा उपक्रम निव्वळ राजकीय संपर्क ठरू नये. आश्वासनापेक्षा, विचारशील कृती हवी.तसेच तरुणाईचा सरकारशी थेट संवाद व्हायला हवा. जो यापूर्वी कधी झाला नाही. यातून विद्यार्थ्यांचे प्रश्नं सुटली जावी. झेन झी आणि सरकार मधले विश्वासाचे नातं भक्कम होणे महत्वाचे ठरते. देशातील तरुणाईचे चैतन्य आजची गरज व भविष्यातील सशक्त राष्ट्राचा आधार आहे.ते टिकवणे शासन व समाजाचे कर्तव्य ठरते.

- ९१३०८३५४५८

# राहुल गांधी घराणेशाही सांभाळून 'पॅट्रियार्ची' कशी मोडणार?

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

राहुल गांधींच्या घराणेशाहीच्या पार्श्वभूमीवर पितृसत्ता ('पॅट्रियार्ची') संपवण्याच्या आवाहनावर सध्या मोठा राजकीय आणि वैचारिक वाद सुरू आहे. राहुल गांधींनी पुण्यातील एका कार्यक्रमात महिलांना संबोधित करताना 'स्मॅश द पॅट्रियार्ची' (पितृसत्ता मोडून काढूया) अशी हाक दिली.समाजात महिलांवर होणारे नियंत्रण, दबाव आणि सुरक्षेचा मुद्दा त्यांनी ऐरणीवर आणला. कोणत्याही मोठ्या राष्ट्रीय पक्षाच्या मुख्य नेत्याने पहिल्यांदाच जाहीर मंचावरून पितृसत्तेविरोधात स्पष्ट भूमिका घेतली आहे.

प्रश्न हा आहे की राहुल गांधींनी , इतरांना शिकवण्यापूर्वी त्यांनी स्वतःच्या पक्षातील घराणेशाही आधी मोडावी.काँग्रेस पक्षात वारसाहक्काला आणि एकाच कुटुंबाला प्राधान्य दिले जाते, यावर मात्र राहुल गांधी बोलायला तयार नाही. घराणेशाही चालवणारे नेते सामाजिक पातळीवर पितृसत्ता कशी संपवणार, असा प्रश्न विरोधक विचारत आहेत.

राहुल गांधी स्वतः एका मोठ्या राजकीय घराण्याचे वारसदार आहेत. एका बाजूला कुटुंबाच्या वारशावर आधारित राजकारण करायचे आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक समानतेच्या गप्पा मारायच्या, हा निव्वळ दांभिकपणा नाही का?

पुण्यातील कार्यक्रमात राहुल गांधींनी तरुणींना "तुम्ही कोणाच्या मालकीच्या नसून स्वतःच्या आहात; स्वतःची जागा मिळवण्यासाठी मोठ्याने आवाज उठवा" असे सांगितले. हे विचार घराणेशाहीच्या पलीकडे जाऊन देशातील ७० कोटी महिलांच्या सक्षमीकरणासाठी गरजेचे आहेत, असा युक्तिवाद समर्थक करतात. मात्र याची सुरुवात राहुल गांधींनी स्वतःपासून काँग्रेस पक्षात करायला पाहिजे.

पितृसत्ता मोडायची आहे, तर गांधी घराण्यात राहुल गांधी (मुलगा) यांना मुख्य राजकीय वारसदार आणि राष्ट्रीय चेहरा म्हणून आधी पुढे का केले गेले? प्रियांका गांधी यांना दीर्घकाळ केवळ प्रचारापुरते मर्यादित ठेवून संसदेत खूप उशिरा का आणले गेले? राजकीय विश्लेषकांच्या मते, जर राहुल गांधींनी खरंच काँग्रेस पक्षामध्ये पितृसत्ता आणि घराणेशाही पूर्णपणे मोडीत काढली, तर काँग्रेसमधील अनेक ज्येष्ठ नेत्यांची (ज्यांची मुले आणि मुली राजकारणात आहेत) राजकीय समीकरणे धोक्यात येतील.

राहुल गांधी यांच्या 'स्मॅश पेट्रिअर्की' (पुरुषप्रधान संस्कृती मोडीत काढणे) या विधानावरून काँग्रेसमधील घराणेशाही आणि सरंजामी सत्ताकेंद्रांवर सातत्याने टीका केली जाते. विरोधक आणि राजकीय विश्लेषकांच्या मते, काँग्रेस पक्षाने स्वतःमधील ही सत्ताकेंद्रे कधी आणि कशी मोडणार, हा सर्वात मोठा प्रश्न आहे.

राहुल गांधी स्वतः नेहरू-गांधी कुटुंबातून येतात, ज्यामुळे पक्षाच्या सर्वोच्च पदांवर एकाच कुटुंबाचा प्रभाव असल्याचा आरोप विरोधक नेहमी करतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस पक्षाचे नेतृत्व आणि देशाचे पंतप्रधानपद बऱ्याच काळासाठी नेहरू-गांधी कुटुंबाकडे (जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी) राहिले आहे.पक्षातील अंतर्गत लोकशाही संपवून सर्वोच्च पदे केवळ एकाच कुटुंबासाठी राखीव ठेवली जातात, असा आरोप भाजपसह इतर विरोधी पक्ष करतात. विरोधक राहुल गांधींना 'नामदार' (वारसाहक्काने पद मिळालेले) आणि स्वतःला 'कामदार' (स्वतःच्या कष्टाने पुढे आलेले) असे संबोधून राजकीय टीका करतात. केवळ केंद्र पातळीवरच नाही, तर विविध राज्यांमध्येही काँग्रेसचे नेतृत्व पिढ्यानपिढ्या ठराविक राजकीय कुटुंबांकडेच राहिले आहे.

काँग्रेस पक्षातील घराणेशाही किंवा कौटुंबिक नेतृत्व केवळ दिल्लीतील गांधी कुटुंबापुरते मर्यादित नसून, भारतातील विविध राज्यांमध्येही अनेक दशकांपासून ठराविक कुटुंबांचेच वर्चस्व राहिले आहे.

महाराष्ट्रः चव्हाण कुटुंबः दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण (जरी ते थेट नातेवाईक नसले तरी वारसा), माजी मुख्यमंत्री डी. जी. चव्हाण आणि अशोक चव्हाण (आता भाजपमध्ये).

विलासराव देशमुख कुटुंबः माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे पुत्र अमित आणि धीरज देशमुख सध्या राजकारणात सक्रिय आहेत.

सुशीलकुमार शिंदे कुटुंबः माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि त्यांची कन्या प्रणिती शिंदे.

हरियाणा (हुड्डा कुटुंब): माजी मुख्यमंत्री चौधरी रणबीर सिंह हुड्डा यांचे पुत्र भूपेंद्र सिंह हुड्डा हरियाणाचे मुख्यमंत्री राहिले.सध्या भूपेंद्र सिंह हुड्डा यांचे पुत्र दीपेंद्र सिंह हुड्डा हे खासदार असून राज्यातील नेतृत्व सांभाळत आहेत.

आसाम (गोगोई कुटुंब): आसामचे सलग १५ वर्षे मुख्यमंत्री राहिलेले दिवंगत तरुण गोगोई यांच्यानंतर, त्यांचे पुत्र गौरव गोगोई सध्या लोकसभेत काँग्रेसचे उपनेते म्हणून पक्षाचा मुख्य चेहरा आहेत.

मध्य प्रदेशःसिंधिया कुटुंबः राजमाता विजयाराजे सिंधिया, माधवराव सिंधिया आणि त्यांचे पुत्र ज्योतिरादित्य सिंधिया यांनी दीर्घकाळ काँग्रेसमध्ये नेतृत्व केले (ज्योतिरादित्य आता भाजपमध्ये आहेत).

नाथ कुटुंबः माजी मुख्यमंत्री कमलनाथ आणि त्यांचे पुत्र नकुल नाथ.

दिग्विजय सिंह कुटुंबः माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह आणि त्यांचे पुत्र जयवर्धन सिंह.

केरळ (करुणाकरन कुटुंब):माजी मुख्यमंत्री के. करुणाकरन यांचे पुत्र के. मुरलीधरन आणि कन्या पद्मजा वेणुगोपाल (आता भाजपमध्ये) यांनी काँग्रेसमध्ये महत्त्वाची पदे भूषवली.

हिमाचल प्रदेश (सिंग कुटुंब):६ वेळा मुख्यमंत्री राहिलेले दिवंगत वीरभद्र सिंह यांच्यानंतर त्यांच्या पत्नी प्रतिभा सिंह (प्रदेशाध्यक्ष) आणि पुत्र विक्रमादित्य सिंह (कॅबिनेट मंत्री) राज्यात काँग्रेसचे नेतृत्व करत आहेत.

राजस्थान (गेहलोत आणि पायलट कुटुंब):माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचे पुत्र वैभव गेहलोत राजकारणात सक्रिय आहेत. माजी केंद्रीय मंत्री दिवंगत राजेश पायलट यांचे पुत्र सचिन पायलट हे राज्यातील काँग्रेसचे मोठे नेते आहेत.

नवीन नेतृत्वाला मर्यादाः पक्षातील अंतर्गत निर्णय प्रक्रिया आजही काही ठराविक नेत्यांच्या प्रभावाखाली असल्याने, तळागाळातील सामान्य कार्यकर्त्यांर्ला सर्वोच्च स्थानी पोहोचणे कठीण होते, अशी टीका केली जाते.

काँग्रेस समर्थकांच्या मते, पक्षाचे अध्यक्षपद किंवा इतर महत्त्वाची पदे आता अंतर्गत निवडणुकांद्वारे (जसे की मल्लिकार्जुन खर्गे यांची निवड) ठरवली जात आहेत.

जनतेचा कौलः राहुल गांधी किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना जनतेने निवडणुकांमध्ये निवडून दिले आहे, त्यामुळे ही थेट लादलेली घराणेशाही नाही, असा युक्तिवाद केला जातो.

महिला आणि वंचितांना संधीः पक्षाकडून 'स्मॅश पेट्रिअर्की' अंतर्गत महिलांना राजकारणात अधिक प्रतिनिधित्व देणे आणि 'जितकी आबादी, तितका हक्क' या सूत्राद्वारे सामाजिक समता आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जाते. राजकीय विश्लेषकांच्या मते, जोपर्यंत काँग्रेस पक्ष आपल्या अंतर्गत रचनेत सर्वसामान्य कार्यकर्त्यांना घराणेशाहीच्या प्रभावाशिवाय मोठ्या पदांवर संधी देत नाही, तोपर्यंत राहुल गांधी यांच्या सामाजिक सुधारणांच्या विधानांवर विरोधकांकडून असे प्रश्न उपस्थित केले जात राहतील.

- ९५६१५९४३०६

# सरकारने जेन-झी ला राजकारणाशी जोडून किंवा संवाद साधून चालणार नाही;तर त्यांच्या वेदनांचा, भावनांचा, भविष्याचा, शिक्षणाचा व रोजगाराचा गांभीर्याने विचार करावा!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

जेन-झी वर होत असलेला अन्याय असह्य झाल्याने त्यांची अन्यायाविरुद्धची आक्रमकता अती तिव्र झाली आहे.त्यामुळे सरकारला घाम सुटल्याचे दिसून येते.यामुळे देशात जनुकाय जेन-झी ची सुनामी आली की काय अशी सरकारला भीती वाटत आहे आणि जेन-झी च्या भीतीने सरकार,संपूर्ण सत्ताधारी राजकीय पक्ष व पक्ष-विपक्षाचे पुढारी जेन-झी ला आपलेसे करण्याच्या मार्गावर लागले आहेत.परंतु जेन-झी च्या वेदना, दुःख,डिस्टर्ब होत असलेली मानसिकता आणि त्यांच्या गंभीर समस्यांकडे सरकार जातीने लक्ष देण्यास तयार नाहीत.

जेन-झी च्या मुलभूत मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करीत असून राजकीय पोळी शेकण्याचे काम करीत आहे ही बाब स्पष्ट दिसून येते.भारत स्वतंत्र झाला.परंतु आजही राजकीय पुढारी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यात मोठी तफावत दिसून येते व सरकारकडून मोठ्या प्रमाणात भेदभाव होतांना आपण पहातो. सध्याच्या परिस्थितीत जेन-झी आक्रमक झाली आहे कारण राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती कमवून देशाचे व जेन-झी चे वाटोळे केले आहे.

जेन-झी चे सरकारला एकच सांगणे आहे की,सरकारी शाळा-महाविद्यालये सर्वांसाठी आहे त्यामुळे सर्वप्रथम सरकारी शाळा-महाविद्यालयामध्ये राजकीय पुढाऱ्यांचे व उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची मुले शिकला पाहिजे, त्याचप्रमाणे सरकारने आरोग्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात योजना व सुविधा जाहीर केल्या आहेत त्यामुळे सर्वसामान्यांनप्रमाणे राजकीय पुढाऱ्यांनी सुध्दा सरकारी रुग्णालयाचा लाभ घ्यावा यामुळे सर्वसामान्य नागरिक व राजकीय पुढारी यात किती मोठी दरी सरकारने निर्माण केली आहे याचे चित्र स्पष्ट देशाला दिसून येईल.

आज युवा पिढीला अभ्यास,पेन,पेंन्सील, पुस्तक व वह्यांची गरज आहे.परंतु युवा पिढीवर होत असलेला अन्याय असह्य झाल्याने त्यांना नाईलाजास्तव आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला ही अत्यंत दुःखद बाब आहे. जंतरमंतर येथे झालेल्या जेन-झी च्या आंदोलनामुळे सरकार जागे झाले आणि त्या अनुषंगाने संघ प्रमुख मोहनजी भागवत यांनी सर्वप्रथम जेन-झी सोबत संवाद साधला आणि आता सरकारने सर्वच राजकीय पुढाऱ्यांना व मंत्र्यांना जेन-झी शी संवाद साधण्याचे आदेश दिले आहेत.याच पार्श्वभूमीवर विरोधी पक्ष सुध्दा सध्या जेन-झी सोबत संवाद साधायला सुरुवात केली आहे.यावरून स्पष्ट होते की, सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना जेन-झी ची ताकद समजायला लागली आहे.सरकारला कदापि वाटत नव्हते की, जेन-झी एवढ्या संख्येने रस्त्यावर येईल.परंतू आजच्या परिस्थितीत जेन-झी च्या वेदना असह्य झाल्या आहे याची जाणीव सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.

आतापर्यंत सरकारने, राजकीय पुढाऱ्यांनी व पक्ष-विपक्षांनी जेन-झी ला वापरून घेतले व याचे दुष्परिणाम जेन-झी ला जाणवू लागले याचाच परिणाम देशासह जगाने जंतरमंतरवरील आंदोलन उघड्या डोळ्यांनी पाहीले. त्याचाच परिणाम म्हणजे आज सरकार व पक्ष विपक्ष जेन-झी समोर नतमस्तक होतांना आपण पहातो. जेनझीचा वापर आतापर्यंत राजकीय पुढाऱ्यांनी भरपूर करून घेतला व सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे अनेक विद्यार्थ्यांनी व बेरोजगाराना नुकसान झाले व आत्महत्या सुध्दा कराव्या लागल्या.परंतु जेन-झी आता जागृत झाली आहे.सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना अजुनपर्यंत जेन-झी च्या वेदना समजल्याच नाही. कारण देशात आज मोठ्या प्रमाणात शिक्षण व्यवस्था ढासळली असुन त्याचा बट्ट्याबोळ झाला आहे.

कारण जी शिक्षण व्यवस्था सर्वसामान्यांसाठी आहे त्यात मोठ्या प्रमाणात भेदभाव दिसून येतो. त्यामध्ये राजकीय पुढाऱ्यांचे मुले, आमदार-खासदारांचे मुले किंवा सरकारमध्ये असलेल्या मंत्र्यांचे किंवा उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची मुले यात मोडतच नाही त्यामुळे सर्वसामान्यांच्या मुलांच्या वेदना सरकार किंवा राजकीय पुढारी समजूच शकत नाही. कारण यांची मुले विदेशात किंवा उच्च खाजगी शिक्षण संस्थांनामध्ये किंवा शाळा-महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असतात आणि त्याचे प्रायश्चित्त आज देशातील जेन-झी ला पेपर फुटीच्या रूपात भोगावी लागते आहे.

आज जेन-झीच्या वेदना असह्य झाल्याने संपूर्ण देशभर जेन-झी सरकारला धारेवर धरतांना दिसत आहे. आज महाराष्ट्रातील ३६२११ खाजगी कंपन्यां बंद झाल्याचे सांगितले जाते.उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्राची उपराजधानी आणि भौगोलिक दृष्ट्या देशाचा केंद्रबिंदु समजल्या जाणाऱ्या नागपूरमध्ये एम्प्रेमिल आणि मॉडेलमील या दोन मोठ्या कंपन्या होत्या व यामध्ये १० हजार पेक्षा अधिक कामगारांना रोजगार मिळत होता.परंतु त्यावेळच्या सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वाथार्साठी या दोन्ही कंपन्या बंद केल्या व आज याच जागेवर गगनचुंबी इमारती व मॉल दिसुन येते. यावरून आपण समजू शकतो की,देशातील कितीतरी कंपन्या राजकीय हेतूने आणि स्वतःच्या स्वार्थासाठी सरकारने किंवा राजकीय पुढाऱ्यांनी बंद पडल्या असतील.

आजच्या परिस्थितीत देशातील अनेक कंपन्यांचा कामाचा तास ८ तासावरून १२ तास करण्यात आलेला आहे यामुळे कामगारांचे आयुमर्यादा घटण्याचे प्रमाण वाढु शकते व आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो.अशामुळे सुध्दा अनेक कारखाने व कंपन्या बंद होतांना दिसत आहे.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# मौदा तालुक्यातील आठ गावांना अखेर एसटीची वाट मोकळी !

## राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या पाठपुराव्याला यश, पावडदौना ते पानमारा बससेवा सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

मौदा तालुक्यातील पावडदौना, वांजरा, मोहखेडी, वडणा, चिरव्हा, नांदगाव आणि पानमारा या गावांतील विद्यार्थी, प्रवासी व नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. या मार्गावर दीर्घकाळापासून एसटी बससेवा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मौदा येथे ये-जा करण्यासाठी पायी किंवा सायकलचा आधार घ्यावा लागत होता. विशेषतः शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता.

या समस्येची दखल घेत शिवसेना मौदा तालुका प्रमुख नितेश वांगे यांनी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची भेट घेऊन संबंधित गावांसाठी एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी केली. यासंदर्भात निवेदन देत त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नाची तातडीने दखल घेत राज्यमंत्री जयस्वाल यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन बससेवा सुरू करण्यासाठी पत्रव्यवहार केला.या पाठपुराव्याला अखेर यश आले असून २४ ऑगस्ट २०२६ पासून मौदा-पावडदौना-वांजरा-मोहखेडी-वडणा-चिरव्हा-नांदगाव पानमारा या मार्गावर एसटी बससेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या गावांतील नागरिक व विद्यार्थ्यांना मौदा शहराशी नियमित वाहतुकीची सुविधा उपलब्ध झाली.

यावेळी ग्रामस्थांनी राज्यमंत्री आशिष जयस्वाल आणि शिवसेना मौदा तालुका प्रमुख नितेश वांगे यांचे अभिनंदन करून आभार मानले. याप्रसंगी ग्रामस्थांनी बसची पूजा अर्चना करून, चालक, वाहक व वांगे दांपत्याच्या गळ्यात हार टाकून त्यांचे स्वागत केले. बससेवा सुरू करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली वाहतुकीची अडचण दूर झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

यावेळी सरपंच शिला नितेश वांगे, ग्रामपंचायत सदस्य दशरथ बोंबाटे, विमल गेडेकार, कंठीराम बावनकर, युवासेना पंचायत समिती सर्कल प्रमुख स्वप्नील भोयर, युवासेना शाखाप्रमुख मोहखेडी विकास निशाणे, युवासेना शाखाप्रमुख वांजरा संचित भोयर, कल्पना शहारे, सीमा चौधरी, स्वप्नील गेडेकार, रायभान हटवार, समीर निशाणे, पंकज भोयर, उमेश भोयर, किरण शहारे, अमित तिवाडे, कपिल भोयर, सुरज तिवाडे, विशाल बोंबाटे, निखिल राऊत, आदित्य भोयर, अंकित बोंबाटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

> स्वातंत्र्यकाळापासून आमच्या गावाकडे बससेवा नव्हती. त्यामुळे शाळेत जाण्या-येण्यासाठी आम्हाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता राज्यमंत्री आशिष जयस्वाल साहेब यांच्या प्रयत्नाने आणि शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बससेवा सुरू झाली आहे. त्यामुळे शाळेत ये-जा करणे सोपे झाले आहे. बससेवा सुरू करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतो.
>
> **- सृष्टी रवी भोयर व परी हरिश्चंद्र भोयर, स्थानिक विद्यार्थी**

## महाराणा प्रताप स्मारकाची विटंबना, समाजबांधवांत संताप



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

दत्तवाडी परिसरातील वसंत विहार कॉलनीच्या सार्वजनिक मैदानात दुर्गामाता मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या वीर महाराणा प्रताप यांच्या भित्तीचित्र स्मारकाची अज्ञात समाजकंटकांनी तोडफोड केल्याने उत्तर भारतीय समाज व महाराणा प्रताप यांच्या अनुयायांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. उत्तर भारतीय समाजबांधव व वीर महाराणा प्रताप यांच्या अनुयायांनी नगरपरिषद व पोलिस विभागाची परवानगी घेऊन या ठिकाणी महाराणा प्रताप यांचे कलात्मक भित्तीचित्र स्मारक उभारले आहे. या स्मारकस्थळी दरवर्षी महाराणा प्रताप जयंती, पुण्यतिथीसह विविध सामाजिक कार्यक्रम उत्साहात आयोजित केले जातात. मात्र, अलीकडे या स्मारकातील महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचा हात तसेच हातातील भाला अज्ञात समाजकंटकांनी क्षतिग्रस्त केल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच मोठ्या संख्येने समाजबांधव घटनास्थळी एकत्र आले. त्यांनी या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

या घटनेप्रकरणी श्री राजपूत करणी सेनेचे जिल्हाध्यक्ष अखिलेश सिंह, समितीचे पदाधिकारी जगदीश सिंह राणा, वाडी शहराध्यक्ष मुकेश सिंह यांच्यासह प्रवीण सिंह, अमरेंद्र सिंह, राम सिंह, संजय भगत व दिव्यम पटले यांनी वाडी पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांनी पोलिसांना घटनेची माहिती देऊन निवेदन साद केले. स्मारकाची तोडफोड करणाऱ्या समाजविघातक प्रवृत्तीच्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना तातडीने अटक करावी, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेची माहिती देऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. स्मारकाची तोडफोड करणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध घेण्याची मागणी समाजबांधवांनी केली आहे.

## महावितरणची 'स्मार्ट' क्रांती: जुलै महिन्यात ग्राहकांची १.५८ कोटींची बचत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वाढत्या महागाईच्या काळात सामान्य ग्राहकांच्या खिशाला होणारी कात्री लक्षात घेता, महावितरणने राबवलेली स्मार्ट टीओडी मीटर योजना नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीज ग्राहकांसाठी खऱ्या अर्थाने लक्ष्मी ठरत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना आर्थिक सवलत देण्याच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमातून एकट्या जुलै महिन्यांत नागपूर परिमंडलातील ४ लाख ८४ हजार ४५० ग्राहकांनी ग्राहकांनी तब्बल १ कोटी ५८ लाख ९३ हजार रुपयांची भरघोस बचत केली आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार, महावितरणने सौर उर्जेच्या वापराला चालना देण्यासाठी ही योजना कार्यान्वित केली आहे. दिवसा सौर उर्जेची उपलब्धता जास्त असल्याने, ती इतर पारंपरिक स्त्रोतांच्या तुलनेत स्वस्त असते. याच स्वस्त विजेचा थेट लाभ ग्राहकांना मिळावा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत, सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना चालू आर्थिक वर्षात प्रति युनिट ८५ पैशांची थेट सवलत दिली जात आहे. ही सवलत भविष्यात १ रुपयापर्यंत वाढवण्याचे महावितरणचे नियोजन आहे.

योजनेच्या अंमलबजावणीनंतर ग्राहकांचा मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. जुलै २०२६ या महिन्यात नागपूर जिल्ह्यातील ३ लाख ८६ हजार ८७८ ग्राहकांनी १ कोटी ३५ लाख रुपयांची बचत केली आहे, तर वर्धा जिल्ह्यातील ९७ हजार ५७२ ग्राहकांच्या वीज बिलात २३ लाख ९० हजार रुपयांची बचत जमा झाली आहे. परिमंडलातील घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक अशा विविध प्रवर्गातील सुमारे ७.६३ लाख ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवण्यात आले असून, यात नागपूर जिल्ह्यातील ६.१२ लाख तर वर्धा जिल्ह्यातील १.५१ लाख ग्राहकांचा समावेश आहे. उर्वरित ग्राहकांनाही बिलिंग सायकलप्रमाणे या प्रक्रियेत सामावून घेतले जात आहे.

या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्राहकांचे डिजिटल सक्षमीकरण. एमसीएल महा ऊर्जा अँपच्या माध्यमातून ग्राहक आता आपल्या वीज वापराचा रिअल-टाइम डेटा पाहू शकतात. मीटर रीडिंगची प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित असल्याने मानवी चुकांना पूर्णविराम मिळाला आहे. ग्राहकांना दर तासाला किंवा दिवसाला किती वीज वापरली, याची माहिती मिळत असल्याने विजेचा वापर नियोजित करणे आता सहज शक्य झाले आहे. बिलांमधील विसंगतीची समस्या दूर होऊन ग्राहकांना त्यांच्या प्रत्यक्ष वापराचेच बिल मिळत आहे.

काही ठिकाणी स्मार्ट मीटरबद्दल चुकीचे समज पसरवून या प्रक्रियेला विरोध दर्शविला जात आहे. यावर नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. "स्मार्ट मीटर बसवण्यासाठी महावितरण कोणतेही शुल्क आकारत नाही, ही प्रक्रिया पूर्णतः मोफत आहे. हे मीटर अधिक अचूक वाचन देतात, त्यामुळे बिल वाढण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ४८ तासांत वीज पुरवठा खंडित होईल किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या अफवांवर ग्राहकांनी विश्वास ठेवू नये," असे आवाहन त्यांनी केले आहे. डेटा सुरक्षिततेबाबतही महावितरणने स्पष्ट केले आहे की, मीटरमधील सर्व माहिती एनक्रिप्टेड स्वरूपात असल्याने ती अत्यंत सुरक्षित आहे.

बँकिंग, रेल्वे आणि मोबाईल सेवांप्रमाणेच वीज वितरण व्यवस्थेला डिजिटल आणि आधुनिक करणे, हे महावितरणचे उद्दिष्ट आहे. स्मार्ट मीटर हे या आधुनिक ऊर्जा व्यवस्थापनाच्या दिशेने टाकलेले पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. अचूक बिलिंग, तक्रारींचे जलद निराकरण आणि सौर उर्जेचा अधिकाधिक वापर या त्रिसूत्रीमुळे नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीज ग्राहक आता खऱ्या अर्थाने सक्षम झाले आहेत. भविष्यात सर्वच ग्राहकांना या स्मार्ट सेवेचा लाभ मिळणार असल्याने, वीज वापराची ही स्मार्ट संस्कृती ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत वीज क्रांती घडवून आणेल, असा विश्वास महावितरणने व्यक्त केला आहे.

# 'एक राखी देश के जवान के नाम'

## इंदिरा गांधी उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी जवानांसाठी बनवल्या आकर्षक राख्या

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर दत्तवाडी येथील इंदिरा गांधी उच्च प्राथमिक शाळेत 'एक राखी देश के जवान के नाम'या अभिनव संकल्पनेवर आधारित राखी मेकिंग स्पर्धा उत्साहात पार पडली. देशाच्या सीमेवर अहोरात्र तैनात राहून देशाचे रक्षण करणाऱ्या भारतीय जवानांप्रती कृतज्ञता, आदर आणि देशप्रेम व्यक्त करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेत इंदिरा गांधी उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि कलागुणांचा वापर करून विविध रंग, आकर्षक साहित्य आणि देशभक्तीपर संदेशांचा वापर करत सुंदर व मनमोहक राख्या तयार केल्या. स्पर्धेतून निवडक आणि उत्कृष्ट राख्या देशसेवेत कार्यरत असलेल्या भारतीय सैनिकांना पाठविण्यात येणार आहेत. आपल्या हाताने तयार केलेली राखी सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांपर्यंत पोहोचणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका नितु खोब्रागडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपले जवान सीमेवर अहोरात्र तैनात राहून देशाचे रक्षण करतात. त्यामुळेच आपण आपले सण-उत्सव शांततेत आणि आनंदात साजरे करू शकतो. त्यांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे सांगत त्यांनी उपक्रमाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या उपक्रमातून चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या मनातील जवानांविषयीचा आदर, देशप्रेम आणि अभिमान प्रकर्षाने दिसून आला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांमधून देशरक्षण करणाऱ्या भावाला बहिणीच्या प्रेमाची आणि कृतज्ञतेची अनोखी भावना व्यक्त झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशांत तलमले सर, नितेश कोरे, राजू तीनखेडे, विद्या चकोले (उपक्रमशील शिक्षिका), नेहा इटणकर, सुनीता तुरणकर, ज्योती रामटेके तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. इंदिरा गांधी उच्च प्राथमिक शाळेने रक्षाबंधनाला देशप्रेमाची जोड देत राबविलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

### थोडक्यात

## भंडाऱ्यातील श्रीकृष्ण मंदिरात विष्णुपुराण कथेला प्रारंभ, ८ सप्टेंबरला महाप्रसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

येथील कृष्ण मंदिर वार्ड मधील 'श्रीकृष्ण मंदिर' येथे महिला मंडळाच्या वतीने भव्य श्री विष्णुपुराण कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामध्ये सुप्रसिद्ध वक्ता सुलोचना सोनकुसरे यांच्या सुमधुर वाणीतून भाविकांना विष्णुपुराणाचा रसस्वाद मिळत आहे. कथेची वेळ दररोज दुपारी ३ ते ६ अशी आहे.कथेचे निरुपण करताना सुलोचना सोनकुसरे यांनी भगवान विष्णूंचे विविध अवतार, विष्णू भक्ती आणि पुराणातील धार्मिक-आध्यात्मिक विचारांचे मानवी जीवनातील महत्त्व अत्यंत सोप्या व ओघवत्या भाषेत पटवून दिले.

महिला मंडळाच्या वतीने आयोजित या दीर्घकालीन धार्मिक कार्यक्रमाला भंडारा शहर व परिसरातील महिला भगिनी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथेचा लाभ घेत आहेत. या ज्ञानयज्ञाची सांगता मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ रोजी महाआरतीने होणार असून, त्यानंतर भव्य महाप्रसादाचे (भंडारा) आयोजन करण्यात आले आहे. या महिनाभर चालणाऱ्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृष्ण मंदिर वार्ड येथील महिला मंडळाचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि स्थानिक नागरिक विशेष परिश्रम घेत आहेत. परिसरातील सर्व विष्णूभक्तांनी दररोज दुपारी ३ वाजता कथेचा लाभ घ्यावा आणि शेवटच्या दिवशी महाप्रसादाला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## वाडी पोलिसांची मोठी कारवाई; दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस, बालाघाटच्या आरोपीकडून मुद्देमाल जप्त




**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

वाडी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने आज अत्यंत धडक कारवाई करत दोन वेगवेगळ्या घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत एका सराईत आंतरराज्यीय चोराला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव राधेश्याम बस्ताराम कोहरे (वय ४५ वर्ष, मूळ रा. ददिया, ता. वाराशिवनी, जि. बालाघाट, पो. ठाणे लालबर्रा, मध्य प्रदेश) असे आहे. हा आरोपी सध्या वाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आठवा मैल, गणेश नगर (वॉर्ड क्र. १) येथे यशोदा पाटील यांच्या घरी भाड्याने राहत होता. वाडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी राधेश्याम कोहरे याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली होती. न्यायालयाने आरोपीला पोलीस कोठडी सुनावली. कोठडी दरम्यान आरोपीची कसून चौकशी केली असता, त्याने त्याचे गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीच्या जबाबावरून वाडी पोलीस ठाण्यातील दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत ,चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला असून, एकूण ५४,०००/- रुपयांचा माल जप्त केला आहे. तपास पथकाची उत्कृष्ट कामगिरी वाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (मा. वपोनि) नितीन मगर यांच्या मार्गदर्शनाखाली, तपास पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) कुणाल धुरट, हेड कॉन्स्टेबल,नागेश्वर दासरवार, विजय वाईदुढे, राहुल नागदेवे , चंद्रकुमार टेकाम आणि पोलीस शिपाई दिलीप बाजाड यांनी केली आहे. पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.

## पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात रक्षाबंधनानिमित्त 'लर्न अँड अर्न' स्टॉल्सचे उत्साहात उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालय, कामठी येथे 'लर्न अँड अर्न' या संकल्पनेअंतर्गत रक्षाबंधनानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या



हस्तकला, घरगुती उत्पादने, खाद्यपदार्थ व विविध वस्तूंच्या विक्रीसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'राखी निमित्त स्टॉल्स' कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. रेणू तिवारी व डॉ. रेणुका रॉय यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे डॉ. स्वप्निल दहाट होते. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हुसेन, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य वंजारी सर, सुपरवायझर मेंढे सर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची भावना विकसित व्हावी, कौशल्याला व्यासपीठ मिळावे आणि "Learning Today, Earning Tomorrow" ही संकल्पना प्रत्यक्षात अनुभवता यावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्या, हस्तकला वस्तू, घरगुती खाद्यपदार्थ व इतर साहित्याचे स्टॉल्स उभारून आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या उपक्रमाचे आयोजन प्रा. पुडके मॅडम व डॉ. हिना कौसर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी मोलाचे सहकार्य केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व उद्योजकीय वृत्तीचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि व्यावहारिक ज्ञानाची जडणघडण होत असल्याचे मत व्यक्त केले.

# आमच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत रस्ता सोडणार नाही !

## पत्रकार परिषदेत सरपंच गुणाराम मेहर यांचे स्पष्टीकरण, २ ऑक्टोबर रोजी रस्ता रोको आंदोलन आयोजित करण्याचा निर्धार कायम



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

पिपरिया ते गल्लाटोला या ४ किलोमीटर रस्त्याच्या रुंदीकरणाच्या आणि गल्लाटोला-पांढरी मार्गावरील मुख्य रस्त्यापासून पुलासह १०० मीटर रस्त्याच्या बांधकामाच्या प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या मागणीवरून पिपरियाचे सरपंच गुणाराम मेहर आक्रमक झाले आहेत. आपल्या मागण्या पूर्ण न झाल्यास, शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६ रोजी गल्लाटोला-पांढरी रस्त्याच्या चौकात सालेकसा-गल्लाटोला मुख्य रस्त्यावर 'रास्ता रोको' (नाकेबंदी) करण्याचा इशारा त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे.

या संदर्भात, सोमवार, १० ऑगस्ट, २०२६ रोजी, त्यांनी स्थानिक आमदार संजय पुरम, तसेच ग्रामपंचायत उपविभागीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, मुख्यमंत्री रस्ते योजनेचे कार्यकारी अभियंता, गोंदियाचे जिल्हाधिकारी, गोंदियाचे पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि ग्रामपंचायत अध्यक्ष यांना एक निवेदन सादर केले.

२१ ऑगस्ट रोजी आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी बोलताना गुणाराम मेहेर यांनी सांगितले की, ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, आता आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. जीपीएसबीचे कार्यकारी अभियंता तकसंदे यांच्याकडून होणाऱ्या गैरवर्तनाबद्दल नाराजी व्यक्त करत, आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आपण रस्ता सोडणार नाही, असे त्यांनी जाहीर केले.

त्यांनी सांगितले की, निवेदन सादर करून दहा दिवस उलटले आहेत, परंतु त्यांना संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. यातून प्रशासनाची उदासीनता स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी पुढे सांगितले की, सरकारपर्यंत आपला आवाज पोहोचावा यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे.

पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत आणि त्यांच्या सहकार्याशिवाय कोणतेही काम शक्य नाही. या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून, या प्रदेशाच्या प्रलंबित मागण्या सरकारपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल.

# हिरवाईत रंगला उमरेडचा श्रावण सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

ग्रीन गार्डन व सच्चिदानंद योग शाखेच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय देवराज इटणकर उद्यान, गाव तलाव परिसर येथे २० ऑगस्ट रोजी उत्साहात श्रावण सोहळा साजरा करण्यात आला.

उद्यानातील गर्द हिरवाई, रंगीबेरंगी फुले, आकर्षक सजावट, फुलांनी सजलेले झुले आणि ८०-९०च्या दशकातील पारंपरिक लुकने सोहळ्याचे विशेष आकर्षण वाढविले. महिलांनी विविध रंगांच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी होत कार्यक्रमात उत्साह भरला. आज फिर जीने की तमन्ना है, या गाण्यावर सादर करण्यात आलेल्या तिरकम्मड नृत्याने उपस्थितांची विशेष दाद मिळवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष प्राजक्ता कारू होत्या. यावेळी माजी नगराध्यक्ष सुमनताई इटणकर, शिक्षण सभापती वैशालीताई बांद्रे, नगरसेविका स्मरणिकाताई राहाटे तसेच सखी मंच च्या अध्यक्षा संगीताताई लांजेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अलकाताई रेवतकर, अरुणाताई हजारे, सुषमाताई पलिये, भारतीताई डुंबरे, चौधरी चव्हाण, सुषमाताई पाठक, ज्योत्स्नाताई गुंफलवार, संध्या मुळे, रूपालीताई पलांदुरकर, सोनलताई लटे, वंदना लांजेवार यांच्यासह सर्व योगसखींचे सहकार्य लाभले.

# पापा जाधव हत्याकांडाने राजुरा हादरले; मुख्य सूत्रधाराच्या अटकेसाठी संतप्त नागरिकांचे आंदोलन



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

विनोद उर्फ पापा जाधव यांच्या निर्घृण हत्येनंतर राजुरा शहरात संतापाची लाट उसळली आहे. हत्येसाठी केवळ गोळीबार करणाऱ्या आरोपींना अटक करून चालणार नाही, तर या हत्येमागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्याला तातडीने अटक करावी, या मागणीसाठी जाधव यांच्या सोमनाथपूर वाडार्तील नागरिकांनी मंगळवारी दि. २५ रोजी दुपारी राष्ट्रीय महामार्गावरील तहसील कार्यालयालगतच्या चौकात रास्ता रोको आंदोलन केले.

आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी दंगा नियंत्रण पथकाला पाचारण केले. यावेळी सौम्य लाठीचार्ज करून आंदोलकांना हटविण्यात आले.दरम्यान, पोलिस बंदोबस्तात मृतकाचा मृतदेह त्यांच्या घरी नेण्यात आला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

सोमवारी दि. २४ रोजी राष्ट्रीय महामार्गावर न्यायालयासमोर अज्ञात हल्लेखोरांनी देशी कट्ट्यातून विनोद उर्फ पापा जाधव यांच्यावर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली होती. या थरारक घटनेने राजुरा शहरात खळबळ उडून भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर करण बाविस्कर आणि करण मेकलवार यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. त्यानंतर पोलिसांनी परवेझ शेख, ऋतिक खामणकर यांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

या प्रकरणी राजुरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३(५) तसेच शस्त्र कायद्यातील कलम ३(२५), ३(२७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे पोलिसांना हत्येमागील कारण, कटाचा सूत्रधार तसेच इतर सहभागींचा शोध घेण्यासाठी आरोपींची सखोल चौकशी करता येणार आहे.

विनोद उर्फ पापा जाधव यांची हत्या सुपारी देऊन करण्यात आल्याचा संशय परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे पोलिसांनी सर्व शक्यता तपासून हत्येमागील खरा सूत्रधार शोधावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पापा जाधव हत्याकांडाचा तपास कोणत्याही दबावाशिवाय करून गोळीबार करणाऱ्यांसह हत्येमागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी राजुरावासीयांनी केली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर राजुरा शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे.

# गोंदिया जिल्ह्याला रेल्वे गाडीची नवी भेट; बिलासपूर-येलहंका साप्ताहिक रेल्वे सेवा सुरू




**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

जिल्ह्याच्या रेल्वे सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडणार असून, बिलासपूर-येलहंका-बिलासपूर (१८२६१/१८२६२) ही साप्ताहिक नवीन रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे. ही रेल्वे गाडी २६ ऑगस्टपासून दर बुधवारी सायंकाळी ६.१५ वाजता बिलासपूर येथून सुटणार असून, गोंदिया मार्गे बल्लारशाहच्या दिशेने येलहंका येथे जाणार आहे. तसेच परतीच्या प्रवासात येलहंका येथून सुटून बल्लारशाहझचांदाफोर्ट मार्गे ही गाडी २७ ऑगस्ट रोजी रात्री ९.५० वाजता गोंदिया येथे पोहोचणार असल्याची माहिती खासदार प्रफुल पटेल व खासदार राजेंद्र जैन यांनी दिली. या नवीन साप्ताहिक रेल्वे सेवेमुळे गोंदिया जिल्ह्यातील प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. बिलासपूर, गोंदिया, चंद्रपूर, बल्लारशाह यांसह मार्गावरील विविध शहरांमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांना अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे.

नवीन रेल्वे सेवेमुळे जिल्ह्याची रेल्वे कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होण्यास मदत होणार असून, प्रवाशांच्या सोयीसाठी ही सेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रेल्वेचा लाभ मिळणार असल्याने जिल्ह्यातील प्रवासी नागरिकांनी खासदार प्रफुल पटेल व खासदार राजेंद्र जैन यांचे आभार मानले आहेत.

# खापरखेडा पोलिसांनी अवघ्या ३ तासात ४ गुन्हेगारांच्या आवळल्या मुसक्या

## बिनासंगम शिवारात चाकूचा धाक दाखवून लुटमार, 'त्या' मित्रानेच दिलेली टीप उघड, २ लाख ९६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

खापरखेडा परिसरात दिवसेंदिवस कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. काही दिवसांपूर्वी घडलेल्या दगडी चाळ गँगवार प्रकरणाची शाई वाळते न वाळते तोच आता बिनासंगम शिवारात चाकूचा धाक दाखवून तरुणाला लुटल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणात घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा पोलिस यंत्रणा कामाला लाऊन खापरखेडा पोलिसांनी अवघ्या ३ तासांत मुख्य सूत्रधारासह चार सराईत गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या असून एका अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले आहे.

**काय घडले ?**

नागपूर येथील पिवळी नदी, महाबळेश्वर नगर येथील रहिवासी फिर्यादी अमन त्रिलोकचंददास दुबे वय ३२ हे २३ ऑगस्ट रोजी त्यांचा मित्र लखन उर्फ गोलू बादल सेठ वय २४ याच्यासोबत बिनासंगम येथे पार्टी करण्यासाठी आले होते. मात्र, मित्र लखनच्या मनात वेगळाच कुटील डाव शिजत होता. त्याने अमनच्या नकळत दुसरा आरोपी सक्षम डोंगरे याला अमनचे लोकेशन आणि फोटो पाठवून टीप दिली.

पार्टी आटोपून दोघेही परत जात असताना आधीच ठरल्याप्रमाणे आरोपी सक्षम डोंगरे, आसिफ मोहम्मद, भूषण कांबळे यांनी दुचाकीने येऊन त्यांना गाठले. आरोपींनी अमनच्या गळ्याला धारदार चाकू लावून जीवे मारण्याची धमकी दिली आणि अश्लील शिवीगाळ करत ४९ हजार ८०० रुपयांची रोकड, सोन्याची चैन व मोबाईल असा एकूण २ लाख ९६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल घेऊन पळ काढला.

**मित्रानेच मित्राच्या पाठित खुपसला खंजीर**

धक्कादायक बाब म्हणजे फिर्यादीच्या स्वतःच्या मित्रानेच आरोपींना टीप दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेनंतर फिर्यादी अमन आणि आरोपी लखन यांनी खापरखेडा पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस शिपाई शेखर वानखेडे आणि आशिष कापसे यांनी आरोपी लखनला सोबत घेऊन घटनास्थळ गाठले. मात्र, घटनास्थळी चौकशीदरम्यान लखन उडवाउडवीची उत्तरे देऊ लागल्याने पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी लखनचा मोबाईल ताब्यात घेऊन तपासला असता, त्यानेच गुन्हेगारांना लोकेशन आणि टीप पाठवल्याचे उघड झाले. पोलिसांनी खाकीचा हिसका दाखवताच लखन पोपटासारखा बोलू लागला व गुन्ह्याची कबुली दिली.

**आरोपींना ४ दिवसांची पोलीस कोठडी**

याप्रकरणी १) लखन उर्फ गोलू बादल सेठ वय २४, रा. पिवळी नदी, नागपूर, २) सक्षम सुशांत डोंगरे वय २०, रा. पिवळी नदी, नागपूर, ३) आसिफ मोहम्मद मुस्तकीम अली वय १८, रा. भिलगाव, कामठी, ४) भूषण सुनील कांबळे वय २४, रा. बालाजी नगर, भिलगाव, कामठी यांना अटक करण्यात आली. तसेच यांच्या विरुद्ध खापरखेडा पोलिसांनी बीएनएस २०२३ च्या कलम ३०९(४), २९६, ३५१(२), ३५२, १२६(२), ३(५) सह महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल केला असून एका अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन यादव, पोउपनि अनोल पाटील, एएसआय मनोहर राऊत, मुकेश महालगावे, संदीप सगणे, अमित खोब्रागडे, आशिष मेश्राम, बादल गिरी, आशिष कापसे, शेखर वानखेडे, सचिन दखने, निल गव्हाणे आणि विशाल नाखले यांच्या पथकाने पार पाडली.

**थोडक्यात**

## प्रनाग हायस्कूल आजनगाव येथे विषय तज्ञांचे मार्गदर्शन व वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

सोमवार (ता.२४ ऑगस्ट) ला प्रनाग हायस्कूल आजनगाव येथे "विषय तज्ञांचे मार्गदर्शन" या उपक्रमा अंतर्गत, विज्ञान शिक्षक गुणरत्न गजभिये यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र आजनगाव येथील वैद्यकीय चमूस मार्गदर्शन करण्याकरिता आमंत्रित केले होते. या संकल्पनेस सकारात्मक प्रतिसाद देत, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रुती थुल, परिचारिका जी. ए. शहा , प्रांजना ढोबळे, कर्मचारी अक्षय वाडीभस्मे उपस्थित होते. मान्यवरांनी "आरोग्य व रोग" या विषयावर मार्गदर्शन केले. ज्याचा लाभ विद्यार्थ्यांसह शाळेतील कर्मचाऱ्यांना सुद्धा झाला. वैद्यकीय चमूने, विषयावर मार्गदर्शनात, रोग कसे होतात व रोग होऊ नये यासाठी घ्यायची काळजी, पावसाळ्यातील रोग व आरोग्याची काळजी, स्वच्छतेचे महत्व पटवून दिले काही बाबी प्रात्यक्षिक करून दाखवल्या.

विद्यार्थ्यांना विज्ञान विषयक संकल्पना अधिक प्रभावीपणे समजाव्या, सखोल ज्ञान वृध्दी व्हावी, हे धेय्य अनुसरून, प्रत्यक्षात तज्ञाकडून सखोल माहिती मिळावी ही बाब पुढे ठेवून, नियमितपणे विज्ञान शिक्षकांनी आजच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विज्ञान शिक्षक गुणरत्न गजभिये यांनी उपस्थित पाहुण्यांना पुस्तक व वृक्ष भेट दिले. कार्यक्रमानंतर मान्यवराच्या हस्ते शालेय परीसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

## राकेश सवाईथुल यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**



नया गोदाम, कामठी येथील रहिवासी राकेश फकीरचंद सवाईथुल यांचे २५ ऑगस्ट रोजी निधन झाले. ते ५९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी व मोठा आप्तपरिवार आहे. अंत्यसंस्कार बुधवार, २६ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा.कामठी मोक्षधाम येथे करण्यात येणार आहे.

## काँग्रेसचे आरोग्यमंत्र्यांच्या नावाने निवेदन, बनगाव आरोग्य केंद्र हटविल्यास आंदोलनाचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

जिल्हा परिषद गोंदियाच्या जिल्हा आरोग्य समिती तसेच सर्वसाधारण सभेत आमगाव शहरातील बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्र बंद करून स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आमगाव, बनगाव, म्हाळी, किडंगीपार, रिसामा, पदमपूर आदी गावांतील नागरिकांच्या आरोग्य सुविधांवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. या निर्णयाच्या विरोधात आमगाव शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या नावाने तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भूमेश्वर पटले यांना निवेदन देण्यात आले. बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे स्थलांतर तातडीने थांबवून हे केंद्र याच ठिकाणी सुरू ठेवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

बनगाव प्राथमिक आरोग्य केंद्र हे परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, केंद्र बंद किंवा स्थलांतरित झाल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवांसाठी दूरवर जावे लागणार असल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले. जनतेच्या आरोग्याशी संबंधित असलेला हा निर्णय मागे न घेतल्यास नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीचे महासचिव रामसिंह चौहान, सचिव इसुलाल भालेकर, जिल्हा पर्यावरण काँग्रेसचे अध्यक्ष बाबा मिश्रा, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष देवकांत बहेकार, कृषी मंडी संचालक महेश उके, जिल्हा ओबीसी काँग्रेसचे उपाध्यक्ष जगदीश चुटे, राधाकिसन चुटे, तालुका अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष पिंकेश शेंडे, तालुका अल्पसंख्याक विभागाचे कार्याध्यक्ष शब्बिर खान, रवी रहांगडाले, रितेश चुटे यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## थकीत मालमत्ता कर वसुली मोहिमेंतर्गत आजवर ११ कोटींची वसुली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नागपूर महानगरपालिकेद्वारा थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी सुरू करण्यात आलेल्या विशेष मालमत्ता कर वसुली मोहिमेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मनपाने सुरू असलेल्या धडक मोहिमेअंतर्गत आजवर (ता.२५) रू.११ कोटींची वसुली करण्यात आली आहे. मंगळवारी मनपाच्या दहाही झोन मध्ये १.५८ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली. महापौर निता ठाकरे यांच्या निर्देशानुसार व आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात व मोहिमेला सुरूवात झाली आहे. या मोहिमेचे नेतृत्व मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., आणि मिलिंद मेश्राम करीत असून, मोहिमेअंतर्गत १ हजार कोटी रुपये थकीत मालमत्ता कर वसूल करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. मनपाच्या स्थायी समितीच्या सभापती श्रीमती शिवानी दाणी-वखरे व सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर तथा कर संकलन समिती सभापती सरिता कावरे यांनीही नागरिकांना थकीत मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त



थोडक्यात

## पोलिस स्टेशनतुमसर अंतर्गत शहरात रूट मार्च संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

सोमवारला नूरुल हसन पोलीस अधीक्षक भंडारा, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन तुमसर अंतर्गत आगामी सन उत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने तुमसर पोलीस ठाणे हद्दीत रूट मार्च आयोजित करण्यात आला होता. सदर रूट मार्च निलेश मोरे अपर पोलीस अधिक्षक सा. भंडारा, यांचे उपस्थीतीत शिवम विसापुरे उपविभागीय पोलीस अधिकारी, अतिरीक्त कार्यभार तुमसर उपविभाग, सुभाष बारसे ठाणेदार पो. स्टे. तुमसर यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन तुमसर तसेच तुमसर उपविभागातील, अधिकारी अंमलदार त्याचप्रमाणे आरसीपी पथक असे एकूण १४ पोलीस अधिकारी, ११४ पोलीस कर्मचारी, यांनी सहभाग घेतला. रूट मार्च दरम्यान शहरातील प्रमुख मार्ग, बाजारपेठ, संवेदनशील ठिकाणे व गर्दीच्या भागातून पथसंचलन करण्यात आले. यावेळी नागरिकांना शांतता, व कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन करण्यात आले. कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलीसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच सदर पथ संचलानानंतर निलेश मोरे अपर पोलीस अधिक्षक सा. भंडारा, यांचे अध्यक्षतेखाली येरली मोहल्ला तुमसर येथे कॉर्नर मिटींग घेण्यात आली. सदर मिटींगमध्ये ४० ते ५० नागरीकांनी उपस्थीती दर्शविलेली असुन सदर मिटींग चे माध्यमातुन ईद-ए-मिलाद संदर्भात शांततापूर्वक कार्यक्रम पार पाळावे तसेच कोणतेही आक्षेपार्ह विधाने करू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी व सर्व धर्मामध्ये व जातीमध्ये एकोपा रहावा व कार्यक्रम शांततेत पार पाडावे, जुलूस रॅलीमध्ये शांततापूर्वक रॅली पार पाडावी वाहतुकीस तसेच सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस प्रशासन नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असून, कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असे यावेळी सांगण्यात आले.

## रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य, नागरिक हैराण

### गावातील मुख्य रस्ता डांबरीकरण करा : ग्रामपंचायत सदस्य जगदीश पेंदाम




**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा (धर्मेंद्र शेरकुरे )**

वरोरा तालुक्यातील अर्जुनी तु. हे शेवटच्या टोकाला असलेला जवळपास २००० वस्तीचे गाव असून येथे पावसाळ्यात नागरिकांना, महिला शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात रस्त्यावरील साचलेल्या गड्ढ्यातील चिखलाचा सामना करावा लागत असुन वाहतूक करताना त्रास सहन करावा लागत असल्यामुळे लवकरात लवकर डांबरीकरण रस्ता बनवण्याची मागणी गावकऱ्यातर्फे ग्रामपंचायत सदस्य जगदीश पेंदाम यांनी केली आहे. अर्जुनी तु. हे गाव वरोरा तालुक्यातील शेवटच्या टोकाला असून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प लगत असून आदिवासी बहुल लोकवस्तीचे गाव आहे स्वातंत्र्याचे ८० वर्षापासून गावातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी, रस्ता, आरोग्याच्या सुविधा पासून वंचित राहिलेले असून वरोरा तालुक्याच्या ठिकाणी दळणवळण, शिक्षण, दवाखाना बाजार, इतर शेती उपयोगी साहित्य इतर इतर कामासाठी येण्यासाठी गावातील मुख्य मार्ग असल्यामुळे नागरिकांना पक्के रस्त्याची आवश्यकता असल्यामुळे गावातील रस्ता पावसाळ्यात ठिकठिकाणी चिखलमय व गड्डेमय झालेले असून दूषित पाणी जमा झालेले आहे त्यामुळे गावात मोठ्या प्रमाणात डासांची पैदास झालेली असून नागरिकांना आरोग्याचा प्रश्न भेडसावत आहे.

तसेच मुख्य रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असल्यामुळे शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना, अंगणवाडी विद्यार्थ्यांना चिखलामधूनच शाळेमध्ये प्रवास करावा लागत आहे. तसेच शेती कामासाठी जाणारा शेतमजूर, शेतकरी महीला यांना सुद्धा नाहक त्रास सहन करावा लागत आहे आधीच परिस्थितीने गरीब आणि रोजंदारीमुळे आर्थिक व मानसिक दृष्ट्या आदिवासी समाज त्रासलेला असून भविष्यातील विकासाच्या बाबतीत आदिवासी समाजाला अतिशय डांबरीकरण रस्त्याची आवश्यकता असल्यामुळे अर्जुनी तु. गावकऱ्याकडुन गावातील मुख्य रस्ता डांबरीकरण करण्याची मागणीचे निवेदन वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राचे आमदार करण देवतळे, उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग, वरोरा व गटविकास अधिकारी पंचायत समिती वरोरा यांना निवेदनातुन मागणी करण्यात आली आहे.

### श्रीकृष्ण गोड़बोले यांचे निधन


**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



गांधी नगर, प्लॉट नं. २५७ येथील रहिवासी श्रीकृष्ण (दिलीप) व्ही. गोड़बोले (वय ७२) यांचे आज सकाळी १० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी श्रीमती वासंती, दोन मुले चिन्मय व तन्मय असा परिवार आहे. त्यांच्यावर आज सायंकाळी ६ वाजता अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उमरेडचा राजा साकारतोय 'श्री जगन्नाथ धाम दर्शन', पुरीच्या रथयात्रेची भव्य अनुभूती उमरेडमध्ये !

### शिवस्नेह गणेशोत्सव मंडळाच्या ३५ व्या वर्षी जगन्नाथ पुरीच्या ऐतिहासिक परंपरेवर आधारित देखावा, गणेशभक्तांसाठी ठरणार आकर्षणाचा केंद्रबिंदू !



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

शहरातील प्रसिद्ध शिवस्नेह गणेशोत्सव मंडळाच्या 'उमरेडचा राजा' उत्सवाचे यंदा ३५ वे वर्ष असून, यानिमित्ताने जगप्रसिद्ध जगन्नाथ पुरी येथील रथयात्रा आणि प्रभू जगन्नाथ अर्थात भगवान श्रीकृष्ण यांच्या भक्तिमय परंपरेवर आधारित 'श्री जगन्नाथ धाम दर्शन' हा भव्य देखावा साकारण्यात येणार आहे.

जगन्नाथ पुरीची रथयात्रा ही भक्ती, श्रद्धा आणि समतेचा अनोखा संगम मानली जाते. याच आध्यात्मिक परंपरेचे दर्शन उमरेडकरांना घडावे, या संकल्पनेतून मंडळाने यंदाच्या देखाव्याची संकल्पना साकारली आहे. भगवान जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा यांचे दर्शन तसेच पुरीच्या रथयात्रेचे भव्य स्वरूप देखाव्यातून उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

यंदाच्या उत्सवाचे वैशिष्ट्य असलेल्या 'श्री जगन्नाथ धाम दर्शन'च्या देखाव्याच्या फलकाचे अनावरण सोमवारी (ता.२४) रात्री उमरेडचा राजा मंडपात उत्साहात करण्यात आले. यावेळी मंडळाचे मार्गदर्शक सल्लागार अशोकभाऊ मने, विकासजी खानोरकर, प्रकाश गोविंदांनी, अनिलभाऊ खानोरकर, अभय लांजेवार, नगरपालिकेचे उपाध्यक्ष अमित झाडे, नगरसेवक क्षितिज खानोरकर, अध्यक्ष प्रशांतकुमार जयस्वाल, सचिव रितेश मने, राहुल मने, डॉ. अनुप शेंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीने भारलेले जगन्नाथ धाम आणि पुरीच्या रथयात्रेचे वैभव उमरेडच्या भूमीत अनुभवता यावे, यासाठी साकारण्यात येणारा हा देखावा गणेशभक्तांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

'उमरेडचा राजा'च्या ३५ व्या वर्षानिमित्त साकारण्यात येणारा हा भक्ती आणि संस्कृतीचा सोहळा नागरिकांच्या मनात आध्यात्मिक अनुभूती निर्माण करेल, अशी अपेक्षा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## जनगणना २०२६चे मानधन अद्यापही प्रलंबित, रक्षाबंधनापूर्वी तातडीने अदा करण्याची मागणी

### शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी, काम पूर्ण करूनही मानधनासाठी प्रतीक्षा

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

जिल्ह्यात जनगणना २०२६च्या कामात सहभागी झालेल्या शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी शासनाच्या निर्देशानुसार आपली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडली. मात्र, जनगणनेचे काम पूर्ण होऊनही संबंधित कर्मचाऱ्यांचे मानधन अद्याप मिळाले नसल्याने नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जनगणना कार्यादरम्यान काही ठिकाणी तांत्रिक तसेच माहितीविषयक अडचणी निर्माण झाल्या होत्या. संबंधित कर्मचाऱ्यांनी आवश्यक स्पष्टीकरण व कागदपत्रे सादर करूनही अनेकांचे मानधन अद्याप प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे.

रक्षाबंधनाचा सण तोंडावर आला असून, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या जनगणना कार्याचे मानधन सणापूर्वीच अदा करण्यात यावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

जिल्हा प्रशासनाने जनगणना कार्यात सहभागी झालेल्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन कोणताही विलंब न करता तातडीने अदा करावे, तसेच संबंधित विभागाला आवश्यक निर्देश देऊन मानधन वितरणाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

## 'आम्ही पोलीस आहोत' म्हणत सोने लुटणाऱ्या इराणी टोळीचा उमरेड पोलिसांनी केला पदार्फाश!

### परळी वैजनाथपर्यंत तपासाची धाव; तीन आरोपी निष्पन्न, २ लाख ५ हजारांचा सोन्याचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

आम्ही पोलीस आहोत, पुढे लुटमार होऊ शकते, अंगावरील दागिने काढून कागदात गुंडाळून ठेवा! असा धाक दाखवत नागरिकांना गंडा घालणाऱ्या इराणी टोळीचा उमरेड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांच्या नावाचा धाक दाखवून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या या टोळीचा तपास थेट परळी वैजनाथपर्यंत पोहोचला. पोलिसांनी तीन आरोपी निष्पन्न केले असून, दोन गुन्ह्यांतील २ लाख ५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.




उमरेड शहरातील मोहपा रोड आणि गजानन टेकडी रोड परिसरात दोन दुचाकीस्वारांनी नागरिकांना अडवून आपण पोलीस असल्याचे भासवले. रस्त्यावर पुढे लुटमार होण्याची भीती दाखवत अंगावरील सोन्याचे दागिने कागदात गुंडाळून सुरक्षित ठेवण्याचा सल्ला दिला. नागरिकांची नजर चुकवत याच बहाण्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गोप आणि अंगठ्या हातोहात लंपास करून आरोपी पसार झाले. या प्रकरणी उमरेड पोलीस ठाण्यात इठर कलम ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा क्रमांक ६२५/२०२६ आणि ७८३/२०२६ असे दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले.

**तांत्रिक तपासातून धागेदोरे; परळीपर्यंत पोलिसांचा माग**

गुन्ह्यांची पद्धत सारखी असल्याने उमरेड पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तांत्रिक पुरावे, उपलब्ध माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी आरोपींचा माग काढला. तपासात तालेब हुसैन इराणी, मोहम्मद फिरोज खान आणि जाफर हबीब बैग, तिघेही रा. शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड, हे आरोपी निष्पन्न झाले.

यानंतर उमरेड पोलिसांचे विशेष पथक थेट परळी वैजनाथच्या इराणी मोहल्ल्यात पोहोचले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी फरार झाले; मात्र पोलिसांनी संयम आणि कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करत आरोपींच्या कुटुंबीयांना विश्वासात घेतले. पंचासमक्ष घरझडती घेतल्यानंतर पोलिसांच्या हाती दोन सोन्याचे गोप आणि दोन सोन्याच्या अंगठ्या लागल्या. एकूण २,०५,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**पोलिसांच्या नावाचा गैरवापर करणाऱ्यांना दणका**

नागरिकांच्या मनात पोलिसांबद्दल असलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेत बनावट पोलीस बनून लूट करणाऱ्या टोळीवर उमरेड पोलिसांनी केलेली ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे. पोलीस आहोत, असे सांगून कोणी दागिने काढण्यास सांगितले, तर नागरिकांनी तात्काळ सावध होऊन जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

ही कारवाई नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मयांक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासात पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोलीस उपनिरीक्षक संदिप सडमेक, पोलीस हवालदार राधेश्याम कांबळे, पोलीस नाईक पंकज बट्टे, पोलीस शिपाई मंगे निंबार्ते, चेतन माहुलकर आणि रमेश टेकाम यांच्या पथकाने विशेष कामगिरी बजावली.

## एकोणा -मार्डा कोळसा खाणीच्या ब्लास्टिंगमुळे वरोरा येथील घरांना तळे!

### संबंधित डब्लूसीएलला तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना



**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**

एकोना मार्डा खुल्या कोळसा खाणीमध्ये सतत दररोज होणाऱ्या ब्लास्टिंग मुळे जवळपासच्या गाव खेड्यामध्ये तसेच वरोरा शहरातील अभ्यंकर वार्ड, शिवाजी वार्ड,माढेळी नाका रोड परिसरातील जानवनारे कंपने, हादरे यामुळे घरांना भींतींना तळे जात असल्यामुळे नागरिकांना असुरक्षितता निर्माण झाली आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्या कार्यालयात चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी वरोरा भद्रावती विधानसभा मतदारसंघाचे आमदार करण देवतळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकिमध्ये ब्लास्टिंगची तीव्रता वाढवण्याची कारणे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न घरांना होणारे संभाव्य नुकसान तसेच ब्लास्टिंगची वेळ पद्धत व तीव्रतेवर आवश्यक निर्बंध याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

भविष्यात नागरिकांना कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी तातडीने योग्य ती कार्यवाही व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी वेकोली प्रशासनाला दिले. यावेळी नगराध्यक्ष अर्चना ठाकरे, उपविभागीय अधिकारी संदीप भस्के, तहसीलदार योगेश कोटकर, डब्लूसीएलचे अधिकारी, उपविभागीय अभियंता अक्षय लोहे, मुख्याधिकारी सिद्धार्थ मेश्राम एडवोकेट मिलिंद देशपांडे, नगरसेवक अक्षय भीवदरे नगरसेवक संतोष पवार, छोटू भाई शेख, आशिष ठाकरे, गजानन बोढाले, नगरसेवक गजानन जीवतोडे, डॉ.आशिष पिसे, विनोद डोमकावळे,रोशनीताई भडके, अनिकेत नाकाडे इत्यादी लोकांची उपस्थिती होती.

### प्रतिभा पुराणिक यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



मनीषनगर निवासी ललित लेखक, कवी मधुसूदन पुराणिक यांच्या पत्नी सौ. प्रतिभा उपाख्य मेघा यांचे आज दिनांक २५ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता. दीर्घ आजाराने निधन झाले. त्याही लेखिका होत्या. त्यांचे 'काव्यचिंतन' पुस्तक प्रकाशित झाले आहे. मृत्युसमयी त्यांचे वय ६० वर्षे होते. त्यांच्या मागे पती व मुलगा आहे. सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार पार पडला.

## लेखिका मनिषा कांबळे सावित्रीबाई फुले समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

साहित्य व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल यवतमाळ येथील कवयित्री, लेखिका व साहित्यिक मनिषा आनंदराव कांबळे यांना 'सावित्रीबाई फुले समाजरत्न पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले.




युवा कर्तृत्व फाउंडेशन, महाराष्ट्र, मानव चेतना जनविकास बहुउद्देशीय सेवा संस्था, नागपूर आणि शुभम क्लासेस, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लक्षवेध कर्तृत्व गौरव संमेलन, अमरावती-२०२६' मध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधी मंदिर सभागृह, गाडगे नगर (शिवाजीनगर) येथे झालेल्या या कार्यक्रमात साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्य आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याला भारत सरकारच्या पद्मश्री पुरस्काराने सन्मानित सुप्रसिद्ध समाजसेवक व मेळघाटातील सेवाकार्याचे प्रेरणास्थान डॉ. रवींद्र कोल्हे, अभिनेत्री राजश्री कोळी, ईशा भिसे, चित्रपट निर्माता धनराज हरडे, दिग्दर्शक, अभिनेता व निमार्ता रविकुमार गजभिये, प्रसिद्ध रांगोळीकार माधुरी सुधा, साहित्यिक नरेंद्र कुमार चव्हाण यांच्यासह साहित्य, कला, सामाजिक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन समृद्धी प्रकाशनचे डॉ. बी. एन. खरात यांनी केले होते. संमेलनाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याची दखल घेत त्यांना पुरस्कार व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

मनिषा कांबळे गेल्या २२ वर्षापासून साहित्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून सामाजिक व वैचारिक विषयांवरील लेखनातून त्यांनी आपली स्वतंत्र साहित्यिक ओळख निर्माण केली आहे. सामाजिक जाणीव, समता, परिवर्तन आणि मानवी मूल्ये या विषयांना त्यांच्या लेखनातून सातत्याने अभिव्यक्ती मिळत आहे.

त्यांचा 'सूर्याचा सूर्य' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून विविध साहित्यिक उपक्रम, कार्यक्रम आणि सामाजिक क्षेत्रातील सहभागातून त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या प्रदीर्घ साहित्यिक प्रवासाची तसेच सामाजिक व वैचारिक योगदानाची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार आणि मानपत्र प्रदान करण्यात आले.

सावित्रीबाई फुले समाजरत्न पुरस्कार हा सन्मान त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कायार्ला मिळालेली महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून भविष्यातही सामाजिक बांधिलकी जपत साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य अधिक प्रभावीपणे करण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे.

पुरस्कार मिळाल्याबद्दल मनिषा कांबळे यांचे साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील साहित्यिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

थोडक्यात

## पहिली राष्ट्रीय पेन्शन प्रणाली जनजागृती कार्यशाळा आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी (पीएफआरडीए) यांच्या पुढाकाराने, पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (पीएचडीसीसीआय) यांच्या सहकार्याने आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) यांच्या पाठिंब्याने विदर्भातील पहिली राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (एनपीएस) जनजागृती कार्यशाळा २६ ऑगस्ट रोजी नागपुरात आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा सकाळी १०.३० वाजता संस्कृती सभागृह, तरुण भारत भवन, २८, फार्मलँडजवळ, सेंट्रल बाजार रोड, रामदासपेठ, नागपूर येथे होणाऱ्या या कार्यशाळेला एमएसएमई डीएफओ, नागपूरचे संचालक विजय सिरसाठ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून पीएफआरडीएचे डीजीएम इस्माईल सलाम प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.

एचडीएफसी सेक्युरिटीजचे ग्रोथ लीडर धवल देसाई, आयसीआयसीआय पेन्शन फंडचे स्टेट हेड वैभव द्विवेदी आणि एसबीआय पेन्शन फंडचे रिलेशनशिप मॅनेजर मोहित शर्मा यांचेही मार्गदर्शन लाभेल. पीएचडीसीसीआय महाराष्ट्राचे सह-अध्यक्ष व एआयडीचे मानद सचिव डॉ. विजय कुमार शर्मा आणि पीएचडीसीसीआय महाराष्ट्राचे सहाय्यक निवासी संचालक प्रशांत नंदी यांनी उद्योजक, नियोक्ते, व्यावसायिक, कर्मचारी तसेच एनपीएस आणि नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान'वर डॉ. शैलेश मेश्राम यांची पीएच.डी.



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींच्या शाळेतील माध्यमिक विभागातील शिक्षक शैलेश मेश्राम यांनी समाजशास्त्र विषयात संशोधन करून पीएचडी प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, सचिव मीराताई चाफेकर सर्व पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचा सत्कार केला. श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींच्या शाळेतील डॉक्टरेट मिळवणारे ते पहिले शिक्षक आहेत. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरने त्यांना 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व इतर योजनांचे ग्रामीण विकासातील योगदान' या विषयातील संशोधनासाठी पीएच.डी. पदवी बहाल केली. त्यांना प्रा. मीना गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

## सीए मिलिंद कानडे यांची आर्थिक प्रकोष्ठ प्रभारीपदी पुनर्नियुक्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश भाजपाच्या विविध प्रकोष्ठांच्या प्रभारी व सहप्रभारी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून त्यामध्ये चार्टर्ड अकाउंटंट व अर्थशास्त्रज्ञ मिलिंद कानडे यांची आर्थिक प्रकोष्ठच्या प्रभारीपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. सीए मिलिंद कानडे यांना देशातील विविध वित्तीय संस्था, उद्योगसमूह तसेच शासकीय प्रकल्पांसोबत काम करण्याचा व्यापक अनुभव आहे. अनेक उद्योग युनिट्सची स्थापना, प्रकल्पांचे आर्थिक नियोजन तसेच धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजकार्याच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य आणि उद्योगविकास या क्षेत्रांतही ते विविध संस्थांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या संचालनात सहभागी होत त्यांनी प्रशासकीय अनुभव सिद्ध केला आहे. औद्योगिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील घडामोडींमध्येही ते सातत्याने सक्रिय भूमिका बजावत आहेत.


आर्थिक प्रकोष्ठाच्या प्रभारीपदी पुनर्नियुक्ती झाल्याबद्दल सीए मिलिंद कानडे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेश उपाध्यक्ष उपेंद्र कोठेकर यांचे आभार मानले.

## विदर्भ साहित्य संघात 'भावतरंग'चे आयोजन आज

### गीता साने यांच्या कथांवर रंगणार चर्चा आणि अभिवाचन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या 'ग्रंथसहवास' उपक्रमांतर्गत उद्या, बुधवार दि. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४.०० वाजता "भावतरंग" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले




आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ लेखिका गीता साने यांच्या कथांवर आधारित विशेष चर्चा आणि कथा अभिवाचन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. वि. स. जोग असणार आहेत, तर मुख्य वक्त्या म्हणून ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. स्वाती धर्माधिकारी मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमात सोनाली अकोलकर, आभा मुळे, अभिषेक बेल्लारवार आणि स्वर्णिमा प्रकाश यांचा विशेष सहभाग असणार असून त्या कथांचे अभिवाचन करणार आहेत. हा कार्यक्रम ग्रंथसहवास ४ था मजला, सांस्कृतिक संकुल, विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथे पार पडणार आहे. तरी सर्व रसिक व साहित्यप्रेमींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने केले आहे.

# सावनेर पोलिसांना चोरांचे आव्हान

### एकाच रात्री तीन घरफोड्या, चोरट्यांनी घर, बँक व दुकान फोडले, पोलिसांसमोर सुरक्षेचे मोठे आव्हान, शहरातील २३ ठिकाणिवरील सुरक्षा कॅमेरे बनले शोभेचे वस्तू










**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर शहरात चोरट्यांनी पोलिसांच्या गस्तीला आव्हान देत एकाच रात्री तब्बल तीन ठिकाणी घरफोड्या केल्याने शहरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरातील दादाजीनगर ते नागमंदिर परिसरात दि. २५ ऑगस्टच्या रात्री २ ते ३ वाजताच्या सुमारास चार चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याची माहिती आहे. मळिालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी सर्वप्रथम माजी नितीन राऊत हे यांच्या घराच्या दरवाजाची कुंडी तोडून घरात प्रवेश केला. मात्र घरातून त्यांच्या हाती विशेष काही लागले नाही.त्यानंतर चोरट्यांनी आयएमए हॉलच्या मागील बंधन बँकेचा दरवाजा तोडला. बँकेचा दरवाजा तोडण्याचे धाडस करणार्या चोरट्यांच्या हाती येथेही काही लागले नाही. त्यानंतर त्यांनी नागमंदिरासमोरील एस. के. असोसिएटेडच्या दरवाजाची कुंडी तोडून सुमारे ५ हजार रुपयांची रोकड लंपास केली.

सकाळी हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर संबंधितांनी सावनेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी घटनास्थळी श्वान पथकाला पाचारण करून ठसे व इतर पुरावे गोळा केले. एकाच रात्री तीन ठिकाणी धाडसी कारवायाय पोलीस गस्त नेमकी कुठे व कसल्याप्रकारे असते असा यक्ष प्रश्न निर्माण होत आहे...?

सुरक्षा कॅमेऱ्यात कैद चित्रफीती नुसार एकाच रात्री चार चोरटे शहरातील विविध ठिकाणी फिरून घर, बँक आणि व्यावसायिक प्रतिष्ठानाचे दरवाजे तोडतात, तरीही पोलिसांच्या गस्तीला याची भनक लागत नाही, हा गंभीर प्रश्न नागरिकातून होत आहे. रात्रीच्या वेळी संवेदनशील भागात पोलीस गस्त किती प्रभावी आहे? सीसीटीव्ही आणि इतर सुरक्षा यंत्रणांचा वापर करून पोलिसांनी चोरट्यांचा माग काढला का? शहरात रात्रीच्या गस्तीचे नियोजन नेमके कसे केले जाते? असे प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित होत असल्याने पोलीसांची रात्रकालीन गस्त संशयाची ठरत आहे.

जिल्ह्यात गुन्हेगारी आणि अपघात कमी झाल्याचा प्रशासनाकडून दावा केला जात असला, तरी एका रात्री तीन ठिकाणी झालेल्या घरफोड्यांच्या घटनेने या दाव्यांपुढेच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. आकडेवारीतील गुन्हे कमी होणे आणि प्रत्यक्ष नागरिकांना जाणवणारी सुरक्षितता यात फरक आहे का, याचे उत्तर पोलिस प्रशासनाने द्यावे, अशी मागणी होत आहे.

**गुन्हेगारीच्या बातम्या दडपण्याचा प्रयत्न?**

गुन्हेगारीच्या घटना घडत असताना त्यांची माहिती नागरिकांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचणे अपेक्षित आहे. मात्र गुन्हेगारीच्या घटनांची माहिती बाहेर येऊ नये किंवा त्यांचे गांभीर्य कमी दिसावे, अशी भूमिका प्रशासनाकडून घेतली जाते का? असा सवालही आता उपस्थित होत आहे.

एकाच रात्री तीन ठिकाणी चोरट्यांनी धुमाकूळ घातला असेल, तर सावनेरकरांनी सुरक्षित समजायचे तरी कसे? पोलिसांनी केवळ पंचनामा व पुरावे गोळा करण्यापुरते न थांबता चोरट्यांना तातडीने जेरबंद करून या प्रश्नाचे उत्तर द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पोलिसांची रात्रीची गस्त नेमकी कुठे होती? चोरट्यांना पोलिसांची भीती उरली नाही का? आणि सावनेरकरांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची? हे प्रश्न या घटनेनंतर अनुत्तरित आहेत.

## कमांडो अकँडमी सैनिकी स्कुल अखेर बंद



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील केळवद येथिल ख्यातीप्राप्त कमांडो आर्मी पोलीस कॅरिअर अकँडमी सैनिक स्कुल येथील अल्पवयीन विद्यार्थिनीशी छेड काढणाऱ्या मालकाच्या गुन्हयात पोक्सो कायदयातंर्गत न्यायालयीन कोठडी झाल्यानंतर अँक्ट्रासिटी अंतर्गत कार्यवाही करण्यात आलेली आहे. दि.१७ ऑगस्टला सावनेर रहिवासी हरिशचंद्र राणे (वय.३८ रा.सावनेर) याची नागपुर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आलेली होती.

केळवद ठाणेदार आशिषसिंह ठाकुर यांच्या माहीतीनुसार अकँडमी मालकावर अनुसूचित जाती,व अनूसूचित अमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ अंतर्गत गुण्हा दाखल करण्यात आलेला आहे. या अकँडमीमधे एकुण ७० विद्यार्थी निवासी होते.त्यापैकी २१ विद्यार्थी ३ री ते ८ व्या वर्गाचे होते. यांची कोणत्याही शाळेत अँडमीशन केलेले नव्हते. केळवद ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार जुन २०२६ ला रात्रीला अकँडमीतील अल्पवयीन विद्यार्थीनिला आफीसच्या मागे बोलावुन तिच्याशी छेडछाड केली होती.

कमांडो आर्मी अकँडमी शाळेची परवाणगी नसतांनाही अनेक वर्षांपासुन सैनिक स्कुल कोणाच्या आर्शिवार्दाने सुरु होती...? असा प्रश्न नागरीकांनी केलेला आहे. या मालकावर पोक्सोची कार्यवाही झाली. दि. २२ शनिवारला शिक्षण विभाग व केळवद पोलीस यांनी शाळा बंदचा फलक लावला. तसेच कार्यालयाला कुलुप लावण्यात आलेले आहे. सावनेर शिक्षण विभागाकडुन अकँडमीच्या अन्य शिक्षण संस्था सदस्याबाबत केळवद पोलीस स्टेशनला तक्रार दाखल का केली नाही? असा प्रश्न पालकांनी केलेला आहे. ओम साई कल्याणकारी शिक्षण संस्थेच्या अन्य सदस्यांवर शिक्षण विभाग काय कार्यवाही करणार? याकडे पिडीत व पालक वर्गाचे लक्ष लागलेले आहे.

**अकँडमीच्या सदस्यांची ही चौकशी होणार**

कमांडो आर्मी अकँडमी शाळेला बंदचा बोर्ड लावलेला आहे.शिक्षण विभागातील वरिष्ठांच्या आदेशाने अकँडमीतील शिक्षण संस्थेतील अन्य सदस्यांची चौकशी करण्यात येईल.

**- अभिजीत कावळे**
**गटशिक्षण अधिकारी,सावनेर.**

## रामटेकात ८ फुटी अजगराचा थरार; कोंबडी गिळलेल्या अजगराला दिले जीवनदान!



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शहरातील जयप्रकाश वार्ड येथे आज दुपारी एका प्रचंड मोठ्या अजगराने पाळीव कोंबडी गिळल्याची धक्कादायक घटना समोर आली. तब्बल ८ फूट लांबीच्या या अजगराला सर्पमित्रांनी अत्यंत शिताफीने रेस्क्यू करून निसर्गाच्या सानिध्यात सुखरूप सोडले. मिळालेल्या माहितीनुसार, आज दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २:१० वाजताच्या सुमारास जयप्रकाश वार्ड येथील रहिवासी रहमान शेख यांच्या घरात एक अवाढव्य अजगर शिरल्याचे आढळून आले. या अजगराने एका कोंबडीला जिवंत गिळले होते, ज्यामुळे त्याला हालचाल करणे कठीण झाले होते.

घरात एवढा मोठा अजगर पाहून शेख कुटुंबीयांची चांगलीच तारांबळ उडाली. त्यांनी तातडीने स्थानिक सर्पमित्रांशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र सागर धावडे आणि सर्पमित्र इरफान पठाण यांनी क्षणाचाही विलंब न करता रहमान शेख याचे घर गाठले. अजगराची परिस्थिती आणि त्याची लांबी लक्षात घेऊन दोन्ही सर्पमित्रांनी अत्यंत काळजीपूर्वक रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले.

अजगराने गिळलेली कोंबडी बाहेर काढली आणि त्यानंतर सर्पमित्रांनी त्याला सुखरूप पकडले. ८ फूट लांबीच्या या अजगराला पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती. सर्पमित्र सागर धावडे आणि सर्पमित्र इरफान पठाण यांच्या तत्परतेमुळे रहमान शेख यांच्या कुटुंबावरील संकट टळले, तसेच या वन्यजीवालाही जीवदान मिळाले. सुरक्षितरीत्या रेस्क्यू केल्यानंतर या अजगराला वनविभागाच्या मार्गदर्शनात नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार आहे. सर्पमित्रांच्या या धाडसी कामगिरीचे परिसरात कौतुक होत आहे.

## प्रज्वल धोटे याचा राष्ट्रीय विज्ञान परिसंवाद २०२६ मध्ये प्रथम क्रमांक

### अरविंद इंडो पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, काटोल येथे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल :** अरविंद इंडो पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, काटोलसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे की, इयत्ता नववीतील मास्टर प्रज्वल धोटे याने अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ (राष्ट्रीय विज्ञान परिसंवाद) मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. प्रज्वलने "Indian Energy Basket 2047 – Prospects and Challenges" या विचारप्रवर्तक विषयावर आपले विचार मांडले. त्याने आपल्या ज्ञानाने, आत्मविश्वासाने, प्रभावी सादरीकरणाने आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाने परीक्षकांची मने जिंकली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी



निवड झाली आहे. या स्पर्धेचे आयोजन शिक्षण विभाग, पंचायत समिती, काटोल यांच्यावतीने राष्ट्रीय विज्ञान परिसंवादाच्या उपक्रमांतर्गत करण्यात आले होते.

प्रज्वलला सुश्री अंजली ढोकें यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रोत्साहनामुळे प्रज्वलच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान मिळाले. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रेरणा देणाऱ्या डॉ. ज्योती राऊत, प्राचार्य, काटोल यांचेही शाळेच्यावतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात सातत्याने प्रोत्साहन व सहकार्य देणाऱ्या मान्यवरांचे आणि हितचिंतकांचे शाळेने मनःपूर्वक आभार मानलेः

# तीच शाळा, तेच गुरुजन, पुन्हा भेटले बालपणीचे मित्र!

## १९९९ बॅचचे स्नेहमिलन ठरले अविस्मरणीय!

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

राष्ट्रीय आदर्श विद्यालय, रामटेक येथे सन १९९९ च्या माजी विद्यार्थी बॅचतर्फे कार्यक्रमाची सुरुवात. पसायदाना करून स्नेहमिलनाचा भावस्पर्शी आणि अविस्मरणीय कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर माजी विद्यार्थी आणि त्यांचे लाडके शिक्षक एकत्र आल्याने संपूर्ण शाळेच्या परिसरात जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि वातावरण भावूक झाले.

कार्यक्रमाला शाळेचे आदरणीय माजी शिक्षक गायधने सर, बेले सर, भडके सर, जोहरे सर, हटवार सर, हांडे सर, येडके मॅडम, शेंद्रे मॅडम, दयार्पूरकर सर तसेच हांडे मॅडम यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. तसेच राष्ट्रीय आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक चन्ने सर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सेलोकर सर,वाघाडे सर आणि परमार सर तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी दिलेले सहकार्य, मार्गदर्शन आणि मोलाची मदत याबद्दल माजी विद्यार्थ्यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे बहारदार आणि प्रभावी सूत्रसंचालन मोनाली भोजने यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले. त्यांच्या उत्स्फूर्त आणि प्रसन्न निवेदनामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत प्राप्त झाली. जुन्या आठवणी, शिक्षकांप्रती असलेला आदर आणि वर्गमित्रांमधील जिव्हाळा यांचा सुंदर संगम त्यांच्या सूत्रसंचालनातून अनुभवायला मिळाला.

यावेळी संगिता नागोसे, विपिन उराडे, गजानन इखार, भूपेश पाठराबे आणि प्रदीप गेडाम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. आपल्या आयुष्यात शिक्षकांनी दिलेले संस्कार, शिस्त, मार्गदर्शन आणि प्रेम याबद्दल त्यांनी अत्यंत प्रेमळ व भावनिक शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या शिक्षकांमुळेच जीवनाला योग्य दिशा मिळाली, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

या स्नेहमिलनाच्या निमित्ताने शिक्षकांनीही आपल्या माजी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या आजवरच्या जीवनप्रवासाबद्दल जाणून घेताना शिक्षकांच्या चेहऱ्यावर अभिमान आणि समाधान स्पष्टपणे दिसत होते. या




भेटीत आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील खरा संघर्ष जवळून समजला. अनेक अडचणी, संकटे आणि जबाबदाऱ्या पेलत आजही ते जिद्दीने, खंबीरपणे आणि आत्मविश्वासाने उभे आहेत, ही निश्चितच अभिमानाची आणि कौतुकाची बाब आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेंद्र भोयर, गजानन इखार, भूपेश पाठराबे, मोनाली भोजने, सुनील हुमणे, संगिता नागोसे, वैशाली मालेवार, निशा अनकर आणि सुषमा धुराई यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी राकेश अडाकणे यांनी उपस्थित सर्व शिक्षक, माजी विद्यार्थी तसेच कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांच्या आभार प्रदर्शनातून शिक्षकांविषयीचा आदर, मित्रांविषयीची आपुलकी आणि या अविस्मरणीय स्नेहमिलना बद्दलची कृतज्ञता व्यक्त झाली. कार्यक्रमाची सांगता पसायदानाच्या मंगलमय स्वरांनी करण्यात आली. यावेळी संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि भावपूर्ण झाले. सर्वांच्या सुख, समृद्धी आणि उज्वल भविष्यासाठी प्रार्थना करत या अविस्मरणीय स्नेहमिलनाची सांगता करण्यात आली. या स्नेहमिलनातून केवळ जुन्या आठवणींना उजाळा मिळाला नाही, तर गुरु-शिष्य नाते काळाच्या ओघातही किती घट्ट आणि जिवंत राहते, याचा सुंदर प्रत्यय आला. शाळेने दिलेले संस्कार, शिक्षकांनी दिलेले मार्गदर्शन आणि मित्रांनी दिलेली साथ हीच आयुष्यभराची खरी कमाई असल्याची भावना या कार्यक्रमातून प्रकर्षाने व्यक्त झाली.

अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा त्याच शाळेच्या परिसरात एकत्र आलेल्या १९९९ बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी हा स्नेहमिलन सोहळा आठवणींच्या कप्प्यात कायमचा जपून ठेवावा असा भावनिक, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय क्षण ठरला.